# प्रकरण चार

## कृषी विभाग

**4.289 75 टक्के अनुदानाने शेडनेट व आच्छादन (MULCHING) साहित्याचा पुरवठा करणेसाठी अनुदान वाटप करणेबाबत**.

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती भिवंडी (कृषी विभाग) यांनी सन 2015-2016 या वित्तीय वर्षात 75 टक्के अनुदानाने शेडनेट व आच्छादन (MULCHING) साहित्याचा पुरवठा करणेसाठी रक्कम रूपये 1,00,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 107 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 नुसार प्रथम प्रशासकीय मंजुरी घ्यावी व नंतर तांत्रिक मंजुरी घ्यावी, असे आदेश असताना व तांत्रिक मंजुरी आदेश क्रमांक व प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक व दिनांक नमुद नाही, असे असतांना पुरवठयाचे आदेश कशाच्या आधारे दिले. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

2) लाभार्थ्यांचे मंजूर प्रस्तावावर जावक कमांक व दिनांक नमूद नाही.

3) जावक क्रमांक ठाजिप कृषि-5/वशी 635/15-16 कृषि विभाग जिल्हा परिषद ठाणे यांनी दिनांक 23/11/2015 रोजी गटास वित्त प्रेषण अदा केले आहे. कृषि विकास अधिकारी यांनी सदर पत्रामध्ये सदर तरतूद दिनांक 15/02/2016 पूर्वी खर्च करावी असे स्पष्ट आदेश दिले असतांना सदर धनादेश दिनांक 31/03/2016 रोजी वाटप केलेले आहेत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 29 नुसार प्रत्येक धनादेश रेखांकीत करून अदात्याच्या खाती जमा करण्यासाठी संवितरीत करणे आवश्यक असताना सदर रकमांचे धनादेश वाटप करून त्याची पोच घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच धनादेश वाटप पोच नोंदवही ठेवलेली नाही.

5) सदर योजना ही 75 टक्के अनुदानाने राबवायची असुन त्यासाठी 25 टक्के लाभार्थी हिस्सा वसूल करून शेड नेट खरेदी करून वाटप करणे आवश्यक असताना लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रूपये 5,000/- इतके अनुदान वाटप केले आहे.

6) खाली तपशिलात दिल्याप्रमाणे शेड नेट खरेदी पावती क्रमांक व दिनांक यामध्ये ब-याच प्रमाणात तफावत येते. उदा - खरेदी पावती क्रमांक 2449, दिनांक 10/11/2015 ची आहे व खरेदी पावती क्रमांक 2437, दिनांक 26/03/2016 ची आहे. तसेच पावती क्रमांक 2441, दिनांक 25/03/2016 ची आहे. यावरून असे दिसून येते की, प्रत्यक्ष शेड नेट खरेदी करण्यापूर्वीच अनुदान वाटप केले आहे.

7) काही शेतक-यांचे शेड नेट व शेती क्षेत्र पाहणी अहवाल नमूद नसताना त्यांनाही अनुदान वाटप केले आहे. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील अनुक्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांच्या निवडीमध्ये अनियमितता होऊ नये म्हणून त्या लाभार्थ्यांची नोंदवही तयार करून लाभार्थीनिहाय लाभ दिल्याच्या यादया तयार कराव्यात व त्यामध्ये दिलेल्या लाभांची नोंद करावी अशा सूचना आहेत, असे आदेश असताना लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडएपी/2008/प्र.क्र.446/वित्त 09, मंत्रालय, मुंबई, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट- ई मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर नियमाचे उल्लंघन झाले आहे.

**4.290 पंचायत समिती शहापूर कृषी गोदामात विना वापर पडून असलेल्या शिल्लक साठ्याबाबबत.**

**पंचायत समिती शहापूर, जिल्हा ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती शहापूर सन 2015-2016 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात कृषी विभागाच्या गोदामाची साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील तपशिलाप्रमाणे साहित्य विना वापर शिल्लक असल्याचे निदर्शनास आलेले आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे 18(1) अनुसार गट विकास अधिकारी यांनी दरवर्षी जून मध्ये साठा नोंदवहीची पडताळणी करुन नियम 98(3) मधील विहित नमुन्यात प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना पाठविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर साठा नोंदवहीतील साहित्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेची योजना राबवितांना, वेळापत्रकानुसार योजना न राबविल्यामुळे व उद्दिष्ट पूर्तीसाठी व्यवहार्य नियोजनाचे अभावामुळे वाटपाअभावी शिल्लक राहिलेल्या साहित्यामुळे नाहक रक्कम गुंतून पडलेली आहे. त्यामुळे एकूण शिल्लक साहित्याची रक्कम परिगणित करुन संबंधित जबाबदार कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

**4.291 बायोगॅस बांधणे पूरक अनुदान योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती तलासरी, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती तलासरी सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी कृषि विभागाकडील बायोगॅस बांधणे करीता 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 3,82,200/- खर्च केलेला आहे. लाभार्थाना आदा केलेल्या पूरक अनुदानाची तपासणी केली असता त्या योजनेतील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

1) कृषि विभागाने तलासरी गटात एकूण 21 लाभार्थींना जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून प्रत्येकी रूपये 6,000/- व शासन अनुदानातून प्रत्येकी रूपये 12,200/- प्रमाणे लाभार्थींना एकूण रुपये 18,200/- अशी रक्कम रुपये 3,82,200/- बायोगॅस बांधणे करीता अनुदान अदा केले आहे. याबाबत लाभार्थींचे प्रस्ताव लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे बायोगॅस अनुदान अदा केलेले लाभार्थी पात्र असलेबाबत लेखापरीक्षणात खात्री देता आली नाही.

2) 21 लाभार्थीना रूपये 18,200/- प्रमाणे रूपये 3,82,200/- रक्कम वार्षिक लेख्यात खर्च दाखवली आहे. पण, प्रत्यक्ष लेखापरीक्षण कालावधी पर्यंत 7 (सात) लाभार्थींचे धनादेश लेखा शाखेत प्रलंबित असल्याचे दिसून येते.

3) उपरोक्त लाभार्थ्यांचे बायोगॅस परिपूर्ण असलेबाबतचे पूर्णत्वाचे दाखले, मुल्यांकन दाखले, उपयोगिता प्रमाणपत्रे व लाभार्थासह बायोगॅस संयत्रासहचे फोटो लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक जीएस/2010/प्रक्र/78/योजना 6, दिनांक 10/03/2010 नुसार बायोगॅस सयंत्र लाभार्थींची सविस्तर माहिती डेटाबेस संगणकावर तयार करून वेब साइटवर अपलोड करणे आवश्यक असताना आशी माहिती वेब साईट वर अपलोड करण्यात आली नाही.

**4.292 कृषि विभागातील शिल्लक साहित्याबाबत.**

**पंचायत समिती अलिबाग, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, अलिबाग सन 2015-2016 मधील कृषी विभाग, जिल्हा परिषद रायगड कार्यालयाने जिल्हा परिषद उपकर निधीमधून शेतकऱ्यांसाठी शेती उपयोगी 33 प्रकारचे विविध साहित्य खरेदी केलेले असून पंचायत समिती अलिबाग कार्यालयास प्राप्त वाटप शिल्लक साहित्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

याबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-09, दिनांक 22/06/2008 नुसार आखुन दिलेल्या वेळाप्रत्रकानुसार योजनेची रुपरेषा लाभार्थी निवड व साहित्य वाटप होणे आवश्यक असताना पंचायत समिती अलिबाग कृषि विभागात लेखापरिक्षण कालावधीपर्यंत साहित्य वाटपाशिवाय शिल्लक असल्याचे दिसून येते.

**4.293 सौर कंदील वाटप केलेबाबत.**

**पंचायत समिती उरण, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 39) -** पंचायत समिती उरण यांनी कृषि विभाग अंतर्गत सेस अनुदानातून प्रमाणक क्रमांक 11, दिनांक 31/03/2016 रुपये 1,80,375/- अन्वये भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्यादित, मुंबई शाखा यांचेकडून 74 नग सौर कंदील खरेदी केले आहेत. सदर खरेदीसाठी पंचायत समिती सभा ठराव क्रमांक 710/03/02/2016 अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे. गटविकास अधिकारी यांचे पत्र क्रमांक 685, दिनांक 23/02/2016 अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर खरेदीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सौर कंदील पुरवठा स्विकारतांना केंद्रीय तपासणी संस्था, कृषि विद्यापीठ, बी.आय.एस. प्रमाणपत्र, अभियांत्रिकी महाविद्यालय यापैकी एका संस्थेचे गुणवत्ता प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे गटविकास अधिकारी यांचे पुरवठा आदेश क्रमांक 684/26/02/2016 मध्ये नमूद असताना कृषि विभागाने सदर बाबींची पूर्तता घेतली नाही.

2) सौर कंदील 75 टक्के अनुदानावर वाटप केले असून सौर कंदील प्रति नग किंमत रुपये 3,250/- आहे. म्हणजेच लाभार्थी हिस्सा रुपये 813/- इतका आहे. सौर कंदील खरेदी करणेपुर्वी लाभार्थी यादी तयार करून व लाभार्थी हिस्सा जमा करूनच खरेदी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. खरेदी केलेनंतर वस्तू वाटप करताना लाभार्थी हिस्सा वसूल केला आहे.

3) दिनांक 21/03/2016 रोजी 54 नग व दिनांक 30/03/2016 रोजी 20 नग अशी दोन टप्यात पुरवठादार यांनी सौर कंदील पुरवठा केला असून त्याचे वाटप दिनांक 17/06/2016 पासून सुरु केले असून लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 30 नग शिल्लक दिसतात.

**4.294 पशुसंवर्धन, समाजकल्याण व कृषी विभागाकडील प्राप्त साहित्य बाबत. (जि.प.सेस)**

**पंचायत समिती रोहा, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23, 24, 25) -** पंचायत समिती रोहाचे सन 2015-2016 च्या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता पशुसंवर्धन, समाजकल्याण व कृषि विभाग पंचायत समिती रोहा यांचेकडे जिल्हा परिषदेकडून प्राप्त साहित्य हे दिनांक 31/03/2016 अखेरपर्यंत वाटप करण्यात आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.1239, दिनांक 09/01/1993 अन्वये योजना ज्या वर्षात राबविण्यात येते त्याच वर्षात त्याचा विनीयोग होणे आवश्यक असतात. परंतू, लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पशूसंवर्धन -139, समाज कल्याण 10 व कृषि विभागा अंतर्गत 518 नग विविध योजने अंतर्गत वाटप केलेले नाहीत. सदर साहित्य लाभार्थी यांना वाटप करुन लाभार्थी हिस्सा रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी/2008/प्र.क्र.466/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार साहित्याची खरेदी आणि वाटप करण्याबाबत निर्देश दिलेले असतांनाही जिल्हा परिषद आणि पंचायत समितीने साहित्य वेळीच खरेदी करुन वाटप केल्याचे दिसून येत नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1083/67, दिनांक 02/07/1993 नुसार साहित्य वाटप केलेल्या लाभार्थी यांच्याकडून विनियोग प्रमाणपत्र घेतले नाही. तसेच सक्षम अधिकाऱ्याकडून फलश्रुती अहवाल घेतलेला नाही.

4) झेरॉक्स मशिनचे वित्तीय वर्ष संपल्यानंतर पंचायत समितीकडे प्राप्त झाल्याचे साठा नोंदणीवरुन दिसून येते. तसेच सदर बाबत आवश्यक ती दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**4.295 कृषि विभाग विशेष घटक योजना साहित्य पुरवठा व वाटपाबाबत.**

**पंचायत समिती महाड, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती महाड अधिनस्त असलेल्या कृषि विभागाचे सन 2015-16 च्या लेखापरिक्षणात साठा नोंदवहीची तपासणी केली असता

जिल्हा परिषद रायगड कृषि विभागाने विशेष घटक योजना अंतर्गत साहित्य खरेदी करून पंचायत समीतीला पुरवठा केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद कृषि विभागाकडून नॅपसॅक स्प्रेपंप 26 नग खरेदी करून पंचायत समितीला प्राप्त झालेले असून पंचायत समीती कृषि विभागाचे साठा नोंदवही तपासली असता 23 नग नॅपसॅक स्प्रेपंप वाटप केल्याचे दिसते व 3 नग वाटप करण्याचे बाकी आहे. सदरचे स्प्रेपंप वाटप का करणेत आले नाही? खुलासा करावा.

2) जिल्हा परिषद कृषि विभागाने महाराष्ट्र कृषि विभाग विकास महामंडळ मर्या. पुणे यांजकडून चलन क्रमांक 22997, दिनांक 30/03/2016 अन्वये ऑईल इंजीन खरेदी केलेले आहे. व पंचायत समिती कृषि विभागाला पुरवठा केलेला आहे. तथापि साठा नोंदवही तपासता 7 नग इंजीन शिल्लक असल्याचे दिसून येते. तरी सदर ऑईल इंजीन आजपर्यंत वाटप का करण्यात आले नाही. खुलासा करावा.

3) जिल्हा परीषद कृषि विभागाकडून आदीवासी क्षेत्राबाहेरील उपाय योजना अंतर्गत महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ पुणे पुरवठादार ओएम डिसुजा पुणे यांजकडून 8 नग ऑईल इंजीन ओरी एस.पी. खरेदी करून पंचायत समिती कृषि विभागाला पुरवठा केला आहे. तथापि, साठा नोंदवही तपासली असता 5 नग वाटप केल्याचे दिसते. 3 नग आजपर्यंत शिल्लक आहे.

4) जिल्हा परिषद कृषि विभागाकडून किसान काळपे 26 नग वाटप केल्याचे दिसते 5 नग आजपर्यंत शिल्लक आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पुर्ण करणे आवश्यक असतांना साहित्याचे वाटप झाल्याचे दिसून येत नाही.

**4.296 कृषी विभागाकडील साहित्य शिल्लक असलेबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती म्हसळा कृषि विभाग सन 2015-2016 या वित्तीय वर्षात मुळ परिच्छेदातील विवरणामध्ये दर्शविलेप्रमाणे 50 टक्के व 75 टक्के अनुदानातील प्राप्त साहित्य वाटप न झाल्याने शिल्लक असल्याचे नमूद केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए- 2008/प्र.क्र.446/वि.क्र.09, दिनांक 20/06/2008 मधील क्रमांक “इ” मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार पालन करण्यात आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसांधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1084/सीआर/1633, दिनांक 16/09/1995 अन्वये लाभार्थी हिस्स्यांची रक्कम वसूल करण्यापूर्वी मागणी का नोंदविली? याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) सदर योजना राबविणेकरिता शिल्लक साहित्याची जिल्हापरिषदेकडील साहित्य खरेदीची रक्कम रुपये 3,30,579/- ची गुंतवणूक विनाकरण गुंतून राहिलेली आहे मंजूर लाभार्थीकडून लाभार्थी हिस्सा त्वरित वसूल करून शिल्लक साहित्य वाटप करून अनुपालन दाखवावे

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्र. 91 नुसार पंचायत समितीस प्राप्त साहित्यची नोंद नोंद साठयाला घेवून प्रत्येक महिन्याचे शेवटी शिल्लक साहित्याचा तपशील काढावयाचा आहे व दर सहा महिन्यांनी शिल्लक साहित्याची संबधीत खात्याचे अधिका-याने तपासणी करणे आवश्यक आहे. परंतू, पंचायत समितीने अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

**4.297 जिल्हा परिषद समाजकल्याण, कृषि व पशुसंवर्धन विभागाकडून प्राप्त साहित्य लेखापरीक्षण कालावधी पर्यंत शिल्लक असलेबाबत.**

**पंचायत समिती मुरुड-जंजिरा, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20, 21, 24) -** पंचायत समिती मुरुड समाजकल्याण विभागास जिल्हा परिषद देय योजनेतून 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय व

अपंग लाभार्थी करिता साहित्य प्राप्त झालेले असून, कृषि विभागात सन 2015-16 या वित्तीय वर्षात 50 टक्के व 75 टक्के अनुदानातील साहित्य व पशुसंवर्धन विभागात सौरकंदील प्राप्त झालेले असून सदर साहित्य लेखापरीक्षण कालावधीपर्यंत वाटप झालेले नाही. साहित्य शिल्लक असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपील 2008/प्र.क्र.446/वित्त 09, दिनांक 20/06/2008 मधील क्रमांक इ मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) सदर योजना राबविणेकरिता शिल्लक साहित्य जिल्हापरिषदेकडील साहित्य खरेदीची 3 विभागांची एकुण रक्कम रुपये 8,13,624/- विनाकारण गुंतून राहिलेली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 नुसार पंचायत समितीस प्राप्त साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेऊन प्रत्येक महिन्याच्या शेवटी शिल्लक साहित्याचा तपशिल काढावयाचा आहे व दर सहा महिन्यानी शिल्लक साहित्याची संबंधित खातेचे अधिकाऱ्यांनी तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1084/सीआर/1633, दिनांक 16/09/1995 अन्वये लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसूल करण्यापूर्वी मागणी का नोंदवली, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. (परि. क्रमांक 21)

5) जिल्हा परिषदेकडील प्राप्त साहित्य मंजूर लाभार्थींना वाटप का करण्यात आले नाही. याचा संबधितांकडून खुलासा होणे आवश्यक आहे. त्यामुळे लाभार्थी लाभांपासून वंचित राहिलेले आहे. सदरचे साहित्य त्वरित वाटप करून अनुपालन दाखवावे.

6) पंचायत समिती मुरुड पशुसंवर्धन विभागास जिल्हा परिषद देय योजनेतून 75 टक्के अनुदानावर सर्वसाधारण लाभार्थी करिता प्राप्त 75 सौरकंदील पैकी 25 सौरकंदील लेखापरीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक आहे. मंजूर लाभार्थींना साहित्य सौरकंदील वाटप का करण्यात आलेले नाही. याचा खुलासा होणे आवश्यक आहे.(परि. क्रमांक 24)

**4.298 80 टक्के अनुदानावर खरेदी करुन वितरीत करण्यात आलेल्या ताडपत्री खर्चातील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती मालवण, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** 80 टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदी करणे योजने अंतर्गत रक्कम रूपये 1,99,515/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने प्राप्त अनुदानास अधिन राहून 100 टक्के खर्च करण्याच्या उद्देशाने 138 ताडपत्री नग खरेदी केले. परंतु, आज दिनांक 23/09/2016 लेखापरीक्षण कालावधी अखेर त्यापैकी फक्त 50 वितरीत करण्यात आले. तर 88 अदयाप शिल्लक पडून आहेत. म्हणजेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंररास/1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/1997 मधिल अट क्रमांक 5 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांस लाभ देणे बंधनकारक असताना पंचायत समितीने केलेले नाही. म्हणजेच सदर वित्तीय वर्षात योजनेचे 100 टक्के उद्दिष्ट साध्य झाल्याचे दिसून येत नाही. परिणामी रक्कम रुपये 1,27,226/- चा निधी अनावश्यक गुंतून राहिली आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

2) खरेदी प्रक्रीया शासन निर्णय, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भां.ख.रा/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधिल परिच्छेद 11 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची खरेदी प्रतिवर्षी 15 फेब्रुवारी पर्यंतच करणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समितीने ताडपत्री पुरवठेदार यांना क्रमांक पंसमा/कृषी/प्लाटीक ताड./3884/2016, दिनांक 16/03/2016 ने पुरवठा आदेश देवून पुरवठेदार यांनी सदर साहित्याचा पुरवठा डिलीव्हरी चलन क्रमांक 7, दिनांक 30/03/2016 ने पुरवठा केलेला आहे. वरील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भारास1093/प्र.क्र.1239/37, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थींचे गाववार मास्टर रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे एखादया व्यक्तीला दुबार लाभ झाला किंवा कसे, याबाबतची खात्री करता आलेली नाही व लाभार्थींचे एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले, याबाबतचे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. परीणामी विहीत मुदतीत व एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले, याबाबत खात्री करता आलेली नाही.

4) लाभार्थी श्रीम. कांचन कृष्णा कुबल यांच्या अर्जाची पडताळणी केली असता मागणी अर्जावरी लाभार्थ्याची स्वाक्षरी नसल्याचे आढळले. तसेच अर्जासोबत जमिनीचा 7/12 उतारा नसल्याचे आढळून आले. अपूर्ण मागणी प्रस्ताव असताना साहित्य संबधितांस कोणत्या आधारे देण्यात आले. त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.299 20 टक्के सेस मागासवर्गीयांना ग्रास कटर पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** प्रमाणक क्रमांक 24, दिनांक 31/03/2016 अन्वये रुपये 2,40,960/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचा एकूण 12 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला असून सदर ग्रास कटरची 90 टक्के रक्कम रुपये 19,123/- व 10 टक्के रक्कम रुपये 2,120/- मिळून पूर्ण किंमत रुपये 21,248/- होती. शासन दर करार शासन निर्णय क्रमांक सुकृऔ/2015/क्र/218/11अे, दिनांक 23/11/2015 नुसार ग्रास कटरची किंमत ही रुपये 15,939/- इतकी असून कृषि विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या टिपणीमध्ये सदर हत्यारे चांगली असून खरेदी करणेस शिफारस आहे. असे नमुद असताना पंचायत समितीने दरपत्रके मागवून सदर साहित्य खरेदी करणेचे प्रयोजन काय ?

2) प्रत्येक ग्रास कटरमागे रक्कम रुपये 3,184/- जादा प्रदान झालेली असून जिल्हा परिषद निधीची नुकसानी झालेली आहे. त्यामुळे सदर बाबीवर केलेला खर्च लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) सदर प्रस्तावांची पडताळणी केली असता -

1. श्री. रामचंद्र सहदेव गोसावी, पालकरवाडी हे शेतकरी / शेतमजूर असलेबाबत कार्यनस्तीत दाखला नाही.

2. श्री. सहदेव बाळाराम चव्हाण, म्हापण हे दारिद्रय रेषेखालील असलेला दाखला नाही. ग्रामसभेचा ठराव नाही.

3. श्री. बाबुराव गोविंद जाधव, होडावडा हे शेतकरी असलेबाबत दाखला नाही.

4. श्री. केशव खेमनाथ गोसावी, रेडी हे शेतकरी असलेबाबतचा व जातीचा दाखला नाही.

5. श्री. महादेव कृष्णाजी मोचेमाडकर, उभादांडा हे शेतकरी असलेबाबत दाखला नाही.

6. श्री. रामा संभू हरीजन, वजराठ ग्रामसभेचा ठराव नाही.

4) दिनांक 15/03/2016 च्या दरपत्रक सूचनेनुसार तीन दरपत्रके प्राप्त झाली. परंतु, देवगड तालुका आंबा उत्पादन सहकारी संस्था व अजय ॲग्रो एजन्सी तळेबाजार यांचे दरपत्रकात साहित्याचा तपशिल पूर्णपणे नमुद नसून फक्त एका दरपत्रकात पूर्ण तपशिल नमुद आहे. (विजयश्री ॲग्रो सर्व्हीस सेंटर, कणकवली) असे असताना वरील दरपत्रके कशी काय स्विकारणेत आली. याचा खुलासा करावा.

5) पुरवठा केलेल्या साहित्याची पुरवठा पूर्व व पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी झालेबाबतचे अभिलेखे कार्यनस्तीत उपलब्ध नाही.

**4.300 पंचायत समिती सेस मधून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक मोटार वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती दिंडोरी, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** प्रमाणक 16, दिनांक 31/03/2016, रक्कम रुपये 1,47,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमजबजावणी नमुद वेळापत्रकानुसार राबविणेत आलेली नाही.

2) पंचायत समितीतील मासिक सभेतील ठरावानुसार योजनेची निवड करणेत आलेली असून पंचायत समितीने मंजूर केलेल्या लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. लाभार्थींचे मागणी संदर्भाचे प्रस्ताव व अर्जाची छाननी केली असता लाभार्थींचे अर्ज मुदतीत प्राप्त झाले बाबत खात्री करता आली नाही. अर्ज कधी प्राप्त झाले व आवक बारनिशीत तशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थींची निवड योग्य झाली किंवा कसे ? याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3) पुरवठा आदेश दिनांक 09/02/2016 मुद मध्येत नमुद नाही. त्यामुळे विलंबाने पुरवठा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच विलंबाने पुरवठयाबाबत दंड वसुल करण्यात आला नाही. करारनामा ( रक्कम रुपये 100/- मुद्रांकावर ) उपलब्ध झाला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही झाली अगर कसे याची खात्री करता आली नाही. प्रस्तावा सोबत मंजूरी आदेशावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी प्रमाणपत्र नमुद केलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र73/34, दिनांक 20/10/1999 मागासवर्गीय यांच्या कल्याणाकरीता योजनेतून 30 टक्के रक्कम महिलांसाठी खर्च करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक आहे. साठा नोंदवहीत वाटपाच्या तारखा नमूद नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर-1633/57, दिनांक 18/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम प्राप्त करुन आर्थिक वर्षात वाटप करणे आवश्यक होते. लाभार्थी हिस्सा जमा तपशील पाहता 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक मोटार उशिराने वाटप केलेले आहे.

8) मास्टर नोंदवहीत लाभार्थी नोंद घेवून परिपुर्ण नोंदवहीसह दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री करुन मास्टर नोंदवही लेखापरीक्षणाला सादर करावी.

9) एकूण 14 लाभार्थ्यांच्या प्रस्तावावर उणीवा तसेच एकाच आर्थिक वर्षात पंचायत समिती सेस मध्ये 50 टक्के अनुदानावर इलेक्ट्रीक मोटार व ताडपत्रीचा दुबार लाभ देण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे दुबार लाभाची रक्कम संबंधीत लाभार्थी यांचेकडून वसुल करावी.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक -1094/ सीआर-2239/ 34/ 67, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीस लाभ दिल्यानंतर सक्षम अधिका-यांनी पाहणी करुन साहित्याचा उपयोग योग्य प्रकारे होत असून याबाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक असताना असा अहवाल दप्तरी नाही.

**4.301 पंचायत समिती सेस 2015-2016 अंतर्गत 50 टक्के अनुदानावर प्लॉस्टीक ताडपत्री पुरवठा करणे ही योजना राबवितांना झालेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती देवळा, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** उपरोक्त योजनेचा उद्देश शेतकऱ्यांनी काढलेल्या पीकांची मळणी, पिकांची (धाण्यांची) साठवण, शेती मालाला पावसापासून संरक्षण इत्यादीकरीता नमुद योजना राबविणेत आलेली असुन रक्कम रुपये 99,543/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1069/555, दिनांक 05/09/1989 आणि पंरास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी निवडीची पध्दती ठरवून दिलेली आहे. तसेच प्रपत्र अ मध्ये नोंदवही ठेवून लाभार्थीची नोंद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. ताडपत्री खरेदीची मोघमपणे मागणी नोंदविलेचे दिसून आलेले आहे. ताडपत्री गटस्तरावर दिनांक 10/03/2016 रोजी पोच झालेल्या असताना वाटप मात्र लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पूर्ण झालेले नाही. लेखापरिक्षण दरम्यान 4 ताडपत्री शिल्लक असल्याचे आढळुन आले.

2) पंचायत समितीकडून खरेदी पुर्व लाभार्थी निवड न करताच ताडपत्री खरेदी केल्याचे दिसून आलेले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड प्रशासकीय, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, लाभार्थी निवड, साहित्य खरेदी वाटप इत्यादीचे नियोजन आणि अंमलबजावणी नियोजित वेळापत्रकानुसार करणेत आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/ सीआर-1633 दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिश्श्याची रक्कम प्रथम वसुल करुन नंतरच साहित्य खरेदी, पुरवठा, लाभार्थ्यांना वाटप करणे आवश्यक असताना ताडपत्री वाटपाचे वेळी लाभार्थी हिस्सा रक्कम वसुल केलेली असून जसजसे साहित्य वाटप होईल तसतशी पुरवठादारास हिस्सा रक्कम प्रदान केलेली आहे. सबब शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

5) नमुना नंबर 33 ची तपासणी केली असता, 50 लाभार्थ्यांना ताडपत्री नगाचे वाटप केल्याचे निदर्शनास आलेले आहे. तथापि, केवळ 48 लाभार्थी हिश्श्याची रक्कम जमा केल्याचे आढळून आलेले असुन उर्वरीत 2 लाभार्थी हिश्श्याची रक्कम रुपये 3,687/- जमा करणे आवश्यक आहे.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/ सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना जिल्हा अधिक्षक कृषि वि.अ., कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी एकत्रीत पाहणी करुन ताडपत्रीचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्या याबाबत प्रमाणित केलेले नाही. ताडपत्री दिलेनंतर सुगीनंतर पिकांचे संरक्षण झालेबाबत अहवाल नमुद नाही.

**4.302 ताडपत्र्या वाटप न करणे बाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती नंदुरबार यांचे लेखापरिक्षण 2015-2016 दरम्यान पंचायत समिती नंदुरबार यांचेकडील कृषि विभागाकडील कृषिसाठा नोंदवही नमुना नंबर 33 तपासली असता जिल्हा परिषद नंदुरबार यांचेकडून जिल्हा परिषद सेस फंडातून सन 2013-2014 मध्ये खरेदी केलेल्या व पंचायत समिती नंदुरबार यांना पुरविलेल्या एकूण 1301 ताडपत्र्या लाभार्थी शेतक-यांना पुरविण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी त्यांचे आदेश क्रमांक 793/2014, दिनांक 28/08/2014 रोजी पुरविण्यात आलेली असुन अजुनदेखील सदर ताडपत्र्या नंदुरबार तालुक्यातील लाभार्थी शेतक-यांना वाटप केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) सदरच्या ताडपत्र्या जवळ जवळ दोन वर्ष उलटूनदेखील लाभार्थी शेतक-यांना शेती उपयोगासाठी न देता त्यांना सदर ताडपत्री लाभापासून वंचित का ठेवण्यांत आले, याबाबत विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.

2) सदरच्या ताडपत्र्या दोन वर्षापर्यंत वाटप न करता ज्या ठिकाणी ठेवण्यांत आलेल्या आहेत त्या ठिकाणी सुरक्षित आहेत किंवा कसे? तसेच सदरच्या ताडपत्र्या न वापरता पडून असल्यामुळे त्या कुजक्या व न वापरण्यायोग्य आहेत किंवा नाही? याबाबत चौकशी करुन ताडपत्र्या सुरक्षित नसल्यास व त्यांचे नुकसान झाले असल्यांस किंवा कुजक्या होवून वापरण्यायोग्य नसतील तर यास जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करुन 1301 ताडपत्र्यांची एकूण रक्कम संबंधीतांकडून संपुर्ण वसुल करावी.

**4.303 आदिवासी उपयोजना ( क्षेत्रांतर्गत ) टीएसपी योजनेअंतर्गत लाभार्थी शेतक-यांच्या बैलजोडी खरेदी प्रस्तावां बाबतच्या उणीवाबाबतची अनियमितता .**

**पंचायत समिती धडगांव अक्राणी, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,09,10,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती धडगांव/अक्राणी यांचे लेखापरिक्षण सन 2015-2016 मध्ये कृषि विभागामार्फत राबविण्यांत आलेल्या आदिवासी उपयोजना (क्षेत्राअंतर्गत) टीएसपी योजनेअंतर्गत सन 2014-2015 मधील निवडयादीमधील मंजुर लाभार्थी शेतक-यांना सन 2015-2016 मध्ये बैलजोडी खरेदीचा प्रत्येकी रुपये 30,000/- चा लाभ देण्यांत आलेला असून निवड यादीमधे नमुद लाभार्थी शेतक-यांचे प्रस्ताव तपासले असता त्यामध्ये अनेक प्रकारच्या उणीवा आढळुन आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

1) शासन निर्णयासोबतच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये नमुद केल्यानुसार संबंधीत लाभार्थ्यांना सदर योजनेतुन बैलजोडी या बाबींचा लाभ यापुर्वी देण्यांत आलेला नाही, याबाबतचा दाखला ब-याच प्रस्तावांसोबत जोडण्यांत आलेला नाही. त्यामुळे संबंधीत लाभार्थ्याला याच योजनेतुन बैलजोडी या बाबींचा लाभ दुबार देण्यांत आलेला आहे किंवा कसे, याबाबतची खात्री लेखापरिक्षणास करता आली नाही

2) ब-याच प्रस्तावांसोबत जमीन स्वमालकीची असल्याबाबतचा जमीनीचा लाभ दिलेल्या वर्षातील अथवा लाभार्थी निवड झालेल्या वर्षातीलच जोडणे आवश्यक असताना जुन्या कालावधीचे नमुना नंबर 7/12 आणि नमुना नंबर 8-अ जोडण्यांत आलेला आहे. त्यामुळे सदरची जमिन लाभ दिलेल्या वर्षात संबंधीत लाभार्थी शेतक-याच्या स्वमालकीचीच आहे किंवा कसे, याबाबत देखील लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

3) सदर योजनेमध्ये मागील 5 वर्षात संबंधीत लाभार्थ्याला सदर बाबींचा लाभ दिलेला नसेल अशाच लाभार्थ्याला लेखापरिक्षण वर्षात सदर योजनेमधुन बैलजोडी या बाबींचा लाभ अनुज्ञेय आहे. परंतु, मागील 5 वर्षात कोणत्या लाभार्थ्याला कोणत्या योजनेतून कोणत्या बाबींचा लाभ देण्यांत आलेला आहे. याबाबतची नोंदवही पंचायत समिती स्तरावर नसल्यामुळे सदर बाबींची पडताळणी लेखापरिक्षणास करता आली नाही. याबाबत गटविकास अधिकारी यांनी सदर प्रकरणामध्ये विशेष लक्ष घालून मागील 5 वर्षात ज्या लाभार्थ्याला ज्या ज्या बाबींचा लाभ देण्यांत आलेला आहे त्याबाबत योजना निहाय नोंदवही तयार करुन अदयावत नोंदवहीसह अनुपालन लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

4) शासन निर्णयासोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थी निवडीबाबत संबंधीत ग्रामसभेला अवगत करणे आवश्यक असतांना त्याबाबतची कागदपत्रे नस्ती सोबत आढळून आलेली नाहीत.

5) जिल्हास्तरीय निवड समिती, नंदुरबार यांचे आदेश क्रमांक जिपनं/ विघयो/ नि.यादी/ 73, दिनांक 21/01/2015 मधील अट क्रमांक 7 मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावांसोबत जोडण्यांत आलेली सर्व झेरॉक्स कागदपत्रे प्राधिकृत प्राधिका-यांकडुन साक्षांकीत करुन घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

6) लाभार्थी शेतक-यांचे प्रस्ताव (अर्ज) पंचायत समिती कार्यालयातील कृषि विभागामध्ये कधी प्राप्त झाला तो दिनांक प्रस्तावावर नमुद नाही. तसेच प्रस्ताव प्राप्त झालेल्या दिनांकानुसार क्रमवारीत लावलेले नाहीत. त्यामुळे विहित मुदतीच लाभार्थ्याचे प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयातील कृषि विभागास प्राप्त झालेले आहेत किंवा कसे, याबाबतची खात्री लेखापरिक्षणांस करता आली नाही.

7) मा. कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे-5 यांचे अंतरिम मार्गदर्शक सुचना जावक क्रमांक/विप्रं-7/ आउयो/ अंतरिम मासु/ 14-15/ 968/ 2014, दिनांक 06/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 11 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना देण्यांत येणा-या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरिता पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवण्यांत येवून त्यामध्ये लाभार्थ्यांना देण्यांत आलेल्या अनुदानाची बाबनिहाय नोंदवही ठेवण्यांत येवुन जिल्हा कृषि अधिकारी ( विघयो ) / कृषि विकास अधिकारी यांनी भेटीच्या वेळी तपासुन तशी नोंद सदर नोंदवहीमध्ये करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाहीदेखील पंचायत समिती स्तरावर करण्यांत आलेली नाही.

8) बैलजोडी खरेदी नियमित जनावरांच्या बाजारांत लाभार्थ्यांच्या संमतीनुसार पशुवैद्यकीय अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) जिल्हा परिषद व कृषि अधिकारी (विघयो) यांच्या उपस्थितीमध्ये करावी असे शासन निर्णयांतील परिशिष्ट (2) व परिच्छेद क्रमांक 4 मध्ये नमुद असतांना सदर खरेदी फक्त कृषि अधिकारी

(विघयो) पंचायत समिती धडगांव व पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती धडगांव यांचेच उपस्थितीत झालेली आहे. सदर खरेदी जिल्हा कृषि अधिकारी विघयो जिल्हा परिषद यांच्या उपसिथतीत का करण्यांत आली नाही याबाबत पंचायत समितीने खुलासा करणे आवश्यक आहे.

9) तसेच कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती धडगांव यांनी 100 टक्के तपासणी करुन तपासणीचा अहवाल विहित नमुन्यामध्ये दरमहा 10 तारखेपर्यंत मा. कृषि आयुक्तालय पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाल्याबाबतची कागदपत्रे देखील नस्तीसोबत आढळून आलेली नाहीत.

**4.304 आदीवासी व मागासवर्गीय शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर सायकल कोळपे, सारायंत्र व नॅपसॅक स्प्रे पंप पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती अकोले, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 36, 37, 38)** - पंचायत समिती अकोले अंतर्गत सन 2015-2016 या आर्थिक वर्षात पंचायत समिती सेस मधुन शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर सायकल कोळपे, सारायंत्र व नॅपसॅक स्प्रे पंप पुरवठा करणेची योजना राबविली असून सदर योजनांवर रक्कम रूपये 4,42,932/- खर्च नोंदविला आहे.

सदर योजनेच्या लेखापरीक्षणास उपलब्ध् लेख्यांची तपासणी केली असता त्यात आढळून आलेल्या अनियमितताबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) सदर योजना महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविणेत आलेली नाही.

2) सदर योजनेची निवड पंचायत समिती ठरावान्वये केली असुन ठरावात लाभार्थीची मंजूर यादी नमूद केलेली नाही. लाभार्थीची निवड करून वस्तु खरेदी करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात मात्र वस्तुंची खरेदी केल्यानंतर लाभार्थ्यांची निवड प्रक्रीया सुरू केलेली आहे. एकुण 354 नग साहित्याची खरेदी केलेली असुन लेखापरीक्षणा दरम्यान केवळ 40 अर्ज प्राप्त झालेले असुन ते देखील परीपुर्ण नाहीत.

3) शासन परिपत्रक क्रमांक 10958/प्र.क्र.73/74, दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थीची प्रपत्र -अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवुन दुबार लाभ प्रदान टाळल्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मात्र आर्थिक वर्ष सन 2015-2016 संपून देखील साहीत्य वाटपाअभावी तसेच पडून असल्याचे स्टॉकबुक रजिस्टरची पडताळणी दरम्यान आढळुन आले.

4) पंचायत समीतीने जावक क्रमांक 157/2016 दिनांक 20/02/2016 अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 नुसार पुरवठा केलेल्या सायकल कोळप्यांची तांत्रिक मापदंड व गुणवत्तेबाबत नमुना तपासणी शासनमान्य संस्थाकडुन करून त्याबाबतचा चाचणी अहवाल नस्तीमध्ये ठेवल्याचे आढळुन आले नाही. तसेच अट क्रमांक 6 नुसार सदर सारायंत्राचे डिझाईन स्पेसिफिकेशन व मराठी भाषेतील तांत्रिक माहितीपत्रक व टुल किट तसेच विक्रीपश्चात सेवा सुविधा पुरविणेबाबतचे लेखी हमीपत्र प्राप्त झालेले नाही.

5) तांत्रिक मंजुरी आदेशातील अटीनुसार लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक असतांना अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्याचे दिसून येते.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1229/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वाटप साहित्याची गटविकास अधिकारी /सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून व लाभार्थ्यांना योजेनेचा प्रत्यक्ष लाभ झाले असलेबाबत व फलश्रुतीबाबत अहवाल तयार करणे आवश्यक आहे. परंतु, वाटपा अभावी अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

7) सदर योजनेची निवड पंचायत समिती ठरावान्वये केली असुन त्या अनुषंगाने व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ, नाशिक यांना जा.क्रं.वशि/स.क./158/2016 अकोले, दिनांक 20/02/2016 अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशान्वये 140 नग नॅपसॅक स्प्रे पंप 30 दिवसांत पुरविणेबाबत कळविले होते. परंतु, महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळ, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्रं.विक्रीना/कृअ-2016-17/197, दिनांक 20/04/2016 अन्वये नॅपसॅक स्प्रे पंप उपलब्ध नसलेबाबत कळविले असुन पुरवठा आदेशानुसार दिनांक 21/03/2016 रोजीच 30

दिवसांची मुदत संपत असलेने साहित्य खरेदीबाबत कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय दिनांक 23/11/2015 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 9 अन्वये अन्य ठिकाणाहुन खरेदीची कार्यवाही होणे गरजेचे होते. परंतु, तसे केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत.

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता केवळ आर्थिक वर्षात समाजकल्याण अंतर्गत खर्च दाखविण्यासाठी खर्च केल्याचे दिसुन येते. तरी उपरोक्त आक्षेपांची पुर्तता होईपावेतो सदर योजनावरील एकुण खर्च रक्कम रुपये 4,42,932/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**4.305 पंचायत समिती सेस फंडातून शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर स्प्रेपंप पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती संगमनेर अंतर्गत पंचायत समिती सेस मधून शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर स्प्रेपंप पुरवठा करणे ही योजना राबवली आहे यावर रक्कम रुपये 4,00,056/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची निवड पंचायत समितीने केली असुन ठरावात लाभार्थी निवड कशांचे आधारे केली याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्राकानुसार राबविणेत आलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक 10958/प्र.क्र.73/74, दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थींची प्रपत्र -अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवुन दुबार लाभ प्रदान टाळण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी हिशाची रक्कम वसुल करणे आवशक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) साठा नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरिक्षण कालावधी पावेतो एकूण 316 स्प्रेपंप खरेदी केली असुन 80 स्प्रेपंप वाटप झालेले आहेत व 236 स्प्रेपंप शिल्लक आहेत. त्यामुळे योजनेचा उददेश सफल झालेला नाही.

6) पुरवठादाराचे देयकातून आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार 2.30 टक्के आयकर रक्कम रुपये 4,600/- वसुल केलेला नाही.

7) नस्तीसोबत करारनामा जोडलेला नाही.

**4.306 जिल्हा परिषदेकडून प्राप्त कृषि विभागाकडील साहित्य वाटपाबाबत.**

**पंचायत समिती आंबेगाव, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 52) -** पंचायत समिती आंबेगाव सन 2015-2016 या लेखापरीक्षण कालावधीमध्ये जिल्हा परिषद, पुणेकडून प्राप्त साहित्याचे वाटप व शिल्लक प्रस्तावांची पडताळणी केली असता, याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या साहित्याची डिलीव्हरी चलने लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाहीत.

2) प्राप्त साहित्याच्या नोंदीसाठा नोंदवही नमुना नंबर 33 वर घेण्यात आलेल्या असुन, वाटप दाखविण्यात आले आहे. परंतु, लाभार्थ्यांना वाटप केलेल्या वस्तुचे मुल्य, वाटप दिनांक नोंदविलेले नाही.

3) सन 2014-2015 मधील साहित्याचा त्याच वर्षात लाभ देणे आवश्यक असताना, सन 2015-2016 मध्ये वाटप झाल्याने लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थींच्या निवडीच्या निकषावर लाभार्थ्यांकडून सादर झालेली कागदपत्रे यांची काळजीपुर्वक छाननी प्रत्येक स्तरावर होणे गरजेचे आहे. ठरविलेल्या निकषांमध्ये न बसणारा लाभार्थी निवडणे किंवा प्रस्तावित करणे ही गंभीर अनियमितता समजली जावी, असे नमूद करण्यात आले आहे. योजनेचा लाभ देताना पात्र लाभार्थी निवड न झाल्यास योजनेचे उद्दिष्ट सफल होत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सीआर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्र. 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय व कुंटुंब निहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थींच्या सर्व नोंदी जात व गावनिहाय व कुटुंब निहाय घेवुन शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही. सदर लाभार्थीची मास्टर नोंदवही शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे ठेवुन अद्ययावत करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

6) शेती विभागाकडील साठा नोंदवहीप्रमाणे साहित्य दिनांक 31/03/2016 रोजी शिल्लक असल्याचे दिसुन आले.

**4.307 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांसाठी ताडपत्री खरेदी करणे व पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12)** - पंचायत समिती पुरंदर, कृषी विभागाकडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपकर निधीतुन 50 टक्के अनुदानावर शेतक-यांसाठी ताडपत्री खरेदी करणे व पुरविणे योजनेतील शासन मान्य दरकरार एजन्सीमार्फत खरेदी करण्याबाबत आदेश दिलेले असुन सदर योजनेची संचिका, प्रस्ताव व साठा नोंदवही यांचे लेखापरीक्षण केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सीआर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय/गावनिहाय व कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आश्यक आहे. त्यानुसार लाभार्थींच्या सर्व नोंदी जात व गाव निहाय व कुटुंबनिहाय घेऊन शासन निर्णयातील अनु क्रमांक 1.5 मधिल 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस /कुटुंबात दुहेरी लाभ दिले नसलेबाबतची खात्री सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1020/प्र.क्र.1418, दिनांक 09/02/2001 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुनच साहित्य खरेदी अथवा योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्रक्र-446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही. योजना राबविणेमध्ये दिरंगाई झाली आहे.

4) पंचायत समिती ठरावामध्ये लाभार्थ्यांच्या नावानिशी लाभार्थी मंजूरीचा ठराव नाही.

5) लाभार्थी हिस्सा भरलेची चलने तपासता सदरची चलने लाभार्थ्यांनी वैयक्तिक न भरता एकापेक्षा जास्त लाभार्थ्यांची रक्कम एकत्रितपणे भरलेली आहे. त्याअनुषंगाने चलनांचे मागे लाभार्थींची नावे नमूद नाही. तसेच लाभार्थी चलन भरणा नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे भरणा चलने कोणत्या लाभार्थ्यांची आहे. याची पडताळणी करता आली नाही. तसेच लाभार्थी भरणा रक्कम ही जिल्हा निधी अनामत सदरी जमा असुन ती आज अखेर भरणा केलेची पुरवठादाराची पोहोच उपलब्ध नाही.

6) लाभार्थी प्रस्ताव व साठा नोंदवहीची पडताळणी केली असता, 22 प्रस्तावांमध्ये उणिवा आढळुन आल्या.

आक्षेपातील अनुक्रमांक 11 ते 22 हे एकाच कुटुंबातील लाभार्थी आहेत. त्यांचा सात बारा व 8अ एकत्र आहे. विभक्त झालेबाबत रेशनकार्डची सत्यप्रत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदरचे कुटुंब विभक्त नसून एकत्र कुटुंब

असलेचे निदर्शनास येते. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सीआर/2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 एकाच कुंटुबातील दोघांना लाभ देय नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1080/सीआर/ 1074/57, दिनांक 29/09/1983 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक 123 9/34, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करून लाभार्थीची आर्थिक उन्नत्ती झाली किंवा कसे, याबाबत फलश्रुती अहवाल दिलेले नाहीत.

**4.308 50 टक्के अनुदानावर 3 एच.पी.विद्युत संच पुरविणे.**

**पंचायत समिती सातारा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 04/11/2015 अन्वये रक्कम रुपये 1,98,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तांत्रिक मंजूरी पाहता त्यामध्ये लाभार्थींच्या निवडीबाबत अटी व शर्ती नमूद नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले आहेत व त्यानुसार निवड करण्यात आली किंवा नाही, याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/सीआर/1633/57 दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असताना त्यानुसार पंचायत समितीने कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांसख-1088/2512/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट 8 चे तरतुदीनुसार सक्षम संस्थेकडून 5 एच.पी. संच बाबतचा गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार चाचणी अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही न केलेने दर्जाबाबत पडताळणी करता आली नाही.

4) एकूण 24 लाभार्थ्यांपैकी 16 लाभार्थ्यांची पुर्वीचे लाईट बील असल्याने त्यांचेकडे विद्युतपंप अस्तित्वात असल्याचे दिसून येते. तरीही लाभ देण्यात आलेला आहे.

5) सदर विद्यूत पंप लक्ष्मी मॉडेल असून तो आय.एस.आय. मार्क असल्याबाबत प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध नाही.

6) आतापर्यंत सदर लाभार्थींचे किती शेती क्षेत्र सिंचनाखाली आले व त्याचा लाभ लाभार्थींस किती झाला व जीवनमान उंचावण्यासाठी त्याचा फायदा झाला किंवा नाही याबाबतचा फलश्रृती अहवाल घेतलेला नाही.

**4.309 50 टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 19, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रूपये 7,93,646/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 अनुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे त्यानुसार दिनांक 30 जून पर्यंत प्रस्ताव स्वीकृती, दिनांक 30 सप्टेंबर पर्यंत प्रस्ताव मंजूरी करणे व जानेवारी अखेरपर्यंत लाभार्थ्यांस वस्तुंचे वितरण करण्याच्या सुचना आहेत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) तांत्रिक मंजूरी पहाता त्यामध्ये लाभार्थींच्या निवडीबाबत अटी व शर्ती नमूद नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले आहेत व त्यानुसार निवड करण्यात आली किंवा नाही, याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/सीआर/1633/57 दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असताना त्यानुसार पंचायत समितीने कार्यवाही केली नाही. तसेच प्रति नग रुपये 9,562/- प्रमाणे 83 लाभार्थ्यांची रक्कम रुपये 7,93,646/- वसुली केल्याबाबत कागदपत्रे उपलब्ध नाही. त्यामुळे लाभार्थी हिस्सा वसुलीची पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांसख-1088/2512/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट 8 चे तरतुदीनुसार सक्षम संस्थेकडून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार चाचणी अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही न केलेने दर्जाबाबत पडताळणी करता आली नाही.

5) अनुदान रुपये 7,93,646/- व लाभार्थी हिस्सा 7,93,646/- पुरवठादारास प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावती उपलब्ध करुन पुर्तता दाखवावी.

6) सदर कडबाकुट्टी यंत्राचे वाटप करण्यात आलेल्या लाभार्थीचे प्रस्ताव दप्तरी उपलब्ध नसल्याने प्रत्यक्ष शेतकऱ्यांना लाभ दिल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

**4.310 50 टक्के अनुदानावर एच.डी.पी.ई पाईप खरेदीबाबत.**

**पंचायत समिती पाटण, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत रक्कम रुपये 3,37,342.5/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील मार्गदर्शक सुचना व परिशिष्ट क्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना नमूद वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक असतांना पंचायत समितीने प्रत्येक टप्प्यावर विलंब केला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/सीआर/1633/57, दिनांक 07/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असताना त्याप्रमाणे सदर योजनेच्या बाबतीत पंचायत समितीने कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास1098/प्र.क्र.73/ 34, दिनांक 20/10/1999 मधील क्रमांक 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे विवरणपत्र “अ” प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थ्यांची नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय व गावनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे.

4) एच.डी.पी.ई. पाईप 532 व 773 नग दिनांक 31/03/2016 अखेर वाटपा विना पडून राहिल्याने प्रती नग रक्कम रुपये 517/- प्रमाणे रक्कम रुपये 6,74,685/- गुंतून पडली आहे.

**4.311 उपकर निधीतून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना चाफकटर मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती मिरज, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती मिरजला सन 2015-2016 मध्ये वाढीव उपकर, उपकरावर प्रोत्साहनपर अनुदानापोटी रक्कम रुपये 30,90,000/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे.

पंचायत समिती मिरज कृषि विभागाने सन 2015-2016 मध्ये उपकर निधीमधून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना चाफकटर मशीन खरेदीसाठी दिनांक 18/10/2015 रोजी जाहिर ई-निविदा सन 2015-2016 वर्तमानपत्रात प्रसिध्द करून प्राप्त 6 निविदांमधून कमी दराची निविदा सुदर्शन ॲग्रो इंजिनिअरिंग, सांगली यांची अंदाजपत्रकीय दराने मंजूर करून 150 नग चाफकटर मशीन खरेदीपोटी रक्कम रुपये 30,90,000/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने उपकर निधीमधून प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 08/01/2016 ने रूपये 15,45,000/- पुरवठादारास रक्कम आदा केली आहे. सदर देयक रक्कमेतून 2 टक्के टीडीएस कपात करून रक्कम अदा केली आहे. परंतु लाभार्थीकडून 50 टक्के लाभार्थी हिश्श्याची रक्कम खाते क्रमांक 3 वर जमा केली आहे. सदर 150 लाभार्थींची 150 नगाची प्रति लाभार्थी कडून 50 टक्के रूपये 10,300/- प्रमाणे रक्कम रूपये 15,45,000/- प्राप्त रक्कम प्रमाणक क्रमांक 24, दिनांक 27/01/2016 नये रक्कम रूपये 15,45,000/- पुरवठादारास प्रदान केली आहे. आयकर अधिनियम 194 सी प्रमाणे पुरवठादारास देय रक्कमेतून 2 टक्के टीडीएस रक्कम रूपये 30,900/- कपात करून शासनखाती भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. तरी सदर रक्कम रूपये 30,900/- संबंधितांकडून वसुल करून शासन सदरी भरणा करावी.

2) सदर साहित्य खरेदी ही महाराष्ट्र शासन उदयोग विकास महामंडळ, कोल्हापूर यांचेकडून करणे आवश्यक होते. सदर साहित्य पुरवठा करणेस त्यांनी असमर्थता दर्शविल्यास इतर पुरवठादार / उत्पादकांकडून साहित्य खरेदी करणे उचित होते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त 3, मंत्रालय मुंबई दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविताना पाळावयाचे वेळापत्रक व जबाबदारी स्पष्ट केली आहे. त्यानुसार योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता 30 जूनपर्यंत, प्रस्ताव छाननी व लाभार्थी निवड 31 मे अखेर, निविदा प्रक्रिया पूर्ण करून खरेदीस प्रशासकीय मान्यता देणे 31 ऑगस्टपर्यंत, पुरवठा आदेश 30 सप्टेंबरपर्यंत, साहित्य वाटप 30 नोव्हेंबरपर्यंत, देयके आदा करणे 31 जानेवारीपर्यंत व योजनेचे विनियोग दाखले 31 मार्चपर्यंत प्राप्त करून घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे नियमबाहयता झालेली आहे.

4) पुरवठादाराबरोबर रूपये 2,200/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करून घेणे आवश्यक होते. तसे केले नाही. तरी पुरवठादाराकडून रक्कम रूपये 2,200/- वसुल करून पुर्तता करावी.

5) अति मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचे तांत्रिक मंजूरी आदेश दिनांक 28/08/2015 नुसार सदर योजने अंतर्गत 2 एच पी पॉवर ऑपरेटेड आडवे चाफकटरचा लाभ हा अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक, महिला, मागासवर्गीय व अपंग शेतक-यांना टक्केवारीनुसार वाटप करण्यात यावे असे सूचित केले असताना अशी कार्यवाही केली नाही.

6) सदर पुरवठादाराकडून 5 टक्के सुरक्षा अनामत का घेतली नाही.

7) प्राप्त कृषि औजारांची मान्यताप्राप्त संस्थेकडून तपासणी करून घेतलेचा चाचणी अहवाल सादर करावा. वरील अभिप्रायांच्या पुर्ततेअभावी खर्च रक्कम रूपये 33,100/- वसुलपात्र व रक्कम रूपये 30,56,900/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**4.312 2 एचपी चाफकटर पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती खानापूर-विटा, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 2, दिनांक 23/02/2016 अन्वये रक्कम रुपये 2,46,500/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/33/ प्र.क्रं.146/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद / पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन व अमंलबजावणी साठीचे वेळापत्रक निश्चित केले आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1093/सीआर/ 1947, दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्याकडुन विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाही.

3) खालील लाभार्थ्याच्या प्रस्तावासोबत त्रुटी दिसून आल्या आहेत.

- सर्वजित तातोबा पाटील (कुर्ली )  यांचा 7/12 व 8 अ उतारा नाही तसेच जनावरे असल्याबाबतचा दाखला नाही.

4) लाभार्थी यादीवर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. सदर यादीस पंचायत समिती सर्वसाधारण सभेची मान्यता असलेचा ठराव लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब ठराव लेखापरिक्षणास उपलब्ध करून मंजुरी बाबत खात्री करून दयावी.

**4.313 50 टक्के अनुदानावर चाफकटर पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती खानापूर-विटा, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती खानापुरचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षण करताना कृषि विभागाने 50 टक्के अनुदानावर चाफकटर पुरविणेबाबत योजना राबविली होती. यावर प्रमाणक क्रमांक 14, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 3,05,984/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देत आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/33/प्र.क्रं.146/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद / पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन व अमंलबजावणी साठीचे वेळापत्रक निश्चित केले आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1093/सीआर/1947, दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्याकडुन विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाही.

3) खालील लाभार्थ्याच्या प्रस्तावासोबत त्रुटी दिसून आल्या आहेत.

- महादेव हिंदुराव देशमुख (माहुली), संपत दाजी मोहिते (हिंगणगाव) अनिल कुमान भगवान चव्हाण (माळवणी), जगन्नाथ दादा बाबर (वाळुज ) व अशोक पांडुरंग शिंदे (भाळवणी) यांचे प्रस्तावासोबत लाईट कनेक्शन असलेबाबतचा दाखला / लाईट बीलची प्रत नाही.

4) लाभार्थी यादीवर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. सदर यादीस पंचायत समितीची सर्वसाधारण सभेची मान्यता असलेचा ठराव लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब ठराव लेखापरिक्षणास उपलब्ध करून मंजुरी बाबत खात्री करून दयावी.

**4.314 शेती विभाग शिल्लक साठयाबाबत.**

**पंचायत समिती आटपाडी, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती आटपाडीचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणामध्ये शेती विभागाकडील शिल्लक साहित्याची साठा नोंदवही नमुना नंबर 33 वर एकुण रक्कम रुपये 22,91,125/- चे साहित्य वाटपा विना शिल्लक असल्याचे आढळून आले. शिल्लक साठयाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- डीपीआर/1088/सीआर 786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्या वित्तीय वर्षा अखेर साहित्य वाटप पूर्ण झाले पाहीजे. असे असताना माहे मार्च, 2016 अखेर साठा नोंदवही नमुना नंबर 33 वर साठा मोठया प्रमाणावर शिल्लक असुन त्यामध्ये रक्कम रुपये 2291125.60/- गुंतुन राहिली आहे. सदर रक्कमेवर प्रचलीत दराने दंड आकारणी करुन संबंधित जबाबदार व्यक्तींकडून वसुल करावी. तसेच साहित्य वाटपाविना शिल्लक ठेवण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

**4.315 पंचायत समिती सेस मधून चाफकटर खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कवठेमहाकाळ, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 2, दिनांक 30/01/2016 अन्वये रक्कम रुपये 2,63,500/- खर्च नोंदविला आहे. त्याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) सदर योजना वेळापत्रकाप्रमाणे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त9, दिनांक 20/06/2008 नुसार राबवण्यात आली नाही.

2) लाभार्थी मंजुरीचा पंचायत समितीचा ठराव नसल्याने लाभार्थी निवडीस पंचायत समिती मंजुरी घेतल्याचे दिसून येत नाही.

3) लाभार्थी हिस्सा लाभार्थी निवडीवेळी खरेदी पूर्वी घेणे आवश्यक असताना सन 2016-17 मध्ये वाटपाच्या वेळी लाभार्थी हिस्सा घेण्यात आल्याचे दिसून येते.

4) लाभार्थी प्रस्ताव लेखापारीक्षणास उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे प्रस्तावाची तपासणी करता आली नाही. सबब योग्य लाभार्थ्यांना लाभ दिल्याची तसेच लाभार्थ्यांकडून प्रस्ताव प्राप्त करून घेऊन लाभार्थी निवड केल्याची खात्री करता येत नाही.

5) विक्री पश्च्यात सेवा देण्याची हमी घेतलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऑ 2013/प्रक्र158/11ए, दिनांक 27/09/2013 नुसार बाजारभावा नुसार किमत किती आहे व त्याची तुलना निश्चित दराशी केल्याबाबतचा उल्लेख टिपणीमध्ये नमूद नसल्यामुळे दराची तुलना कशी केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

7) कृषि विद्यापीठ / शासन अभियांत्रिक संस्था यांचा तपासणी अहवाल नस्ती सोबत नाही.

8) लाभार्थी हिस्सा दिनांक 31/03/2016 अखेर कृषि विकास महामंडळ यांना अदा केला नाही.

9) नस्ती सोबत warenty card जोडलेले नाही.

10) महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ यांचेकडील तपासणी अहवाल दिनांक 08/11/2015 रोजीचा दिला असताना पुरवठा (प्राप्त) दिनांक 15/10/2015 (डिलीव्हरी चलन नुसार) रोज कसा झाला याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.316 चाफकटर वाटपातील अनियमितता.**

**पंचायत समिती वाळवा-ईस्लामपूर, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती वाळवा सन 2015-2016 या लेखापरीक्षण कालावधीत कृषि विभागाकडील प्रस्तावांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या.

श्री, मारुती संभाजी पाटील रा. येडेनिपाणी यांच्या चाफकटर लाभासंदर्भात आलेल्या प्रस्तावाची तपासणी केली असता प्रस्ताव शर्तीतील अटीनुसार खातेधाराच्या नावावर 20 आर पेक्षा जास्त व 100 आर पेक्षा कमी जमीनक्षेत्र असावयास हवे परंतु श्री. मारुती पाटील यांच्या नावावर 115 आर क्षेत्र असल्याचे खाते उतारावरून दिसून येते. त्यानुसार त्यांचा प्रस्ताव पात्र नसताना त्यांना काय आधारे लाभ दिला. याचा खुलासा अप्राप्त झाल्याने त्यांना अदा केलेली रक्कम रुपये 8,500/- वसुलात आणावी.

**4.317 जिल्हा परिषद उपकर निधीतून 50 टक्के अनुदानावर 5 एच.पी.विद्युतपंप संच पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती शिराळा, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदर बाबत रक्कम रुपये 3,60,000/- खर्च नोंदविला आहे. पंचायत समिती शिराळाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये कृषि विभागामार्फत जिल्हा परिषद उपकर निधीतुन 50 टक्के अनुदानावर 5 एच.पी. विदयुतपंप संच अल्प/ अत्यल्प व इतर भुधारक शेतकऱ्यांना पुरविणेबाबत योजना राबविण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 5 एच.पी.विदयुत पंप पुरविणेबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्रक्रं/446/वित्त 3, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना काटेकोर

राबविण्याबाबत परिशिष्ट ई मध्ये वेळापत्रक दिलेले आहे. त्यानुसार वैयक्तिक लाभ योजना 31 जुलै पर्यंत लार्भार्थी निवड करुन 31 जानेवारी अखेर साहित्य वाटप पुर्ण करणे आवश्यक होते. त्यानुसार वेळापत्रकाचे बंधन पाळलेले नाही.

2) मंजूर लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) लाभार्थींचे प्रस्तावासोबत भुजल सर्वेक्षण दाखले घेण्यात आलेले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/प्रक्र1239/34, दिनांक 01/09/1996 नुसार वाटप केलेल्या साहित्याची पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष खात्री करुन लाभार्थ्यांच्या आर्थीक स्थीती अहवाल तयार करावयाचा आहे तो लेखापरीक्षकास उपलब्ध झालेला नाही.

5) उपरोक्त योजनेची लाभार्थी मास्टर नोंदवही अपूर्ण आहे.

6) पुरवठा आदेश दिनांक 07/08/2015 रोजीचा आहे, तथापि साहित्याचा पुरवठा दिनांक 04/02/2016 रोजी झालेला आहे. सदर पुरवठा आदेशातील अटी नुसार 45 दिवसांत होणे आवश्यक होते परंतु पुरवठा 137 दिवसांनी उशिरा झालेला आहे त्यामुळे 137 दिवसांचा दंड परिगणित करुन पुरवठादाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

7) प्रस्तावात त्रुटी आढळुन आल्या (उदा. 7/12 उता-यावर विहीर नोंद नाही, ग्रामपंचायत ठराव नाही, साठा नोंदवहीवरील स्वाक्षरी व करारपत्रावरील स्वाक्षरीमध्ये तफावत आहे.)

**4.318 जिल्हा परिषद उपकर निधीतून 50 टक्के अनुदानावर 2 एच पी मोटरवर चालणारे चाफकटर पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती शिराळा, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदर बाबत रक्कम रुपये 5,04,000/- खर्च नोंदविला आहे. पंचायत समिती शिराळाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये कृषि विभागामार्फत ग्रामीण भागातील शेतक-याना 50 टक्के अनुदानावर 2 एच पी मोटरवर चालणारे चाफकटर पुरवठा करणेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 2 एच पी मोटरवर चालणारे चाफकटर पुरविणेबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्रक्रं/446/वित्त 3, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना काटेकोर राबविण्याबाबत परिशिष्ट ई मध्ये वेळापत्रक दिलेले आहे. त्यानुसार वैयक्तिक लाभ योजना 31 जुलै पर्यंत लार्भार्थी निवड करुन 31 जानेवारी अखेर साहित्य वाटप पुर्ण करणे आवश्यक होते. त्यानुसार वेळापत्रकाचे बंधन पाळलेले नाही.

2) साठा नोंदवहीवर लाभार्थींच्या दिनाकिंत पोहोच घेतलेल्या नाहीत त्यामुळे साहित्य वाटप वित्तीय वर्षात झालेबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 37/डीपीआर/1088/सीआर-786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्या वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असता तशी कार्यवाही झालेली नाही.

3) मंजूर लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) साहित्य पुरवठा झालेबाबत डिलीव्हरी चलन लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही, त्यामुळे साहित्य पुरवठा विहित कालावधीत झालेबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

5) साहित्याचा गुणवत्ता चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही, त्यामुळे साहित्याच्या गुणवत्तेबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/प्रक्र1239/34, दिनांक 01/09/1996 नुसार वाटप केलेल्या साहित्याची पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष खात्री करुन लाभार्थ्यांच्या आर्थीक स्थीती अहवाल तयार करावयाचा आहे तो लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

7) उपरोक्त योजनेची लाभार्थी मास्टर नोंदवही अपूर्ण आहे.

8) लाभार्थी प्रस्तावासोबत  विज बिल घेण्यात आलेले नाही.

प्रस्तावात त्रुटी आढळुन आल्या (उदा. ग्रामपंचायत ठराव नाही, रहिवाशी दाखला नाही)

**4.319 50 टक्के अनुदानावर 3 एचपी इले. मोटर खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कडेगांव, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती कडेगावचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करताना कृषि विभागाने पंचायत समिती सेस मधून 50 टक्के अनुदानावर 3 एचपी मोटर खरेदीबाबत प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,47,254/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देत आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/33/प्र.क्र. 146/वित्त 8, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत स्तरावर राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमल बजावणीसाठी वेळापत्रक निश्चित केले आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) लाभार्थ्याची गावनिहाय लाभार्थिनिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सबब लाभार्थ्यांस यापुर्वी लाभ झाल्याची वा दुबार लाभाची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही.

3) तांत्रिक मंजूरी आदेशामधील अट क्रमांक 1 नुसार 3 एचपी मोटर वाटप हे कडेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना करणेचे आहे, तथापि लाभार्थीकडुन रहिवाशी दाखला घेतलेला नाही.

4) साठा नोंदवहीची पडताळणी केली असता दिनांक 31/03/2016 अखेर एकूण नग 17 इले. मोटर शिल्लक आहेत. सदर शिल्लक राहिलेले साहित्य वाटप का करण्यात आले नाही? याबाबत साधार खुलासा करावा. सदर मोटारी त्वरित वाटप करण्यात याव्यात.

5) 4 लाभार्थ्यांच्या प्रस्तावासोबत लाईट बील जोडण्यात आलेले नाही.

**4.320 पंचायत समिती उत्तर सोलापूर कृषि विभागाकडील शिल्लक साहित्याबाबत.**

**पंचायत समिती उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 51) -** पंचायत समिती उत्तर सोलापूर कडील सन 2015 -2016 चे कृषि विभागाच्या लेखापरीक्षणावेळी जिल्हा परिषदेकडून जिल्हा परिषद सेस अंतर्गत प्राप्त कृषि औजारे व अनुषंगिक साहित्याच्या साठा नोंद्वहीची तपासणी केली असता पंचायत समितीकडे कृषि विभागात गोडावून मध्ये शिल्लक साहित्य असून विनावापर पडून आहे. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) उपरोक्त औजारे दिनांक 31/03/2016 रोजी पंचायत समिती मधील गोडावुन मध्ये पडून असून सदरचे साहित्य का वाटप झाले नाही, याबाबत खुलासा सादर करावा.

2) उपरोक्त सहित्य विनावाटप व विनावापर पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम रुपये 7,77,200/- नाहक गुंतून पडलेली आहे. याबाबत पंचायत समितीची उदासीनता दिसून येते.

3) उपरोक्त औजारे एकून 68 विनावाटप पडून राहिल्याने लाभार्थी लाभापासून वंचित राहिलेले आहे. सदरची योजना ही सन 2015-16 हया वर्षाकरीता असल्याने सदरचे साहित्य त्याच वर्षात वाटप होणे गरजेचे असतना तसे न झाल्याने योजनेचा हेतु सफल होताना दिसत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 98 (1) नुसार गट विकास अधिकारी यांनी दर वर्षी जूनमध्ये साठा नोंदवहीची पडताळणी करुन नियम 98 (3) मधील विहीत नमुन्यात प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना पाठविणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

5) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रमाचे मुल्यमापन तीन स्तरावर करण्यात यावे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी लाभ दिल्यानंतर चाचणी / तपासणी केलेली नाही, त्यामुळे सदर योजना राबविल्यामुळे लाभार्थ्यांचा काय फायदा झाला, याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

7) तालुक्यातील शेतकरी वर्गाची मागणी नसताना अनावश्यक कृषि औजरांची मागणी करण्याचे प्रयोजन काय याबाबत खुलासा सादर करावा. तसेच यापुढे जिल्हा परिषदेकडून साहित्य मागणी नोंदविताना वस्तूनिष्ट मागणी नोंदविण्याची दक्षता घ्यावी.

**4.321 पंचायत समिती कृषि विभागाकडील नादुरुस्त साहित्याबाबत.**

**पंचायत समिती करमाळा, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 48) -** पंचायत समिती करमाळा कडील सन 2015 -2016 चे कृषि विभागाच्या लेखापरीक्षणावेळी जिल्हा परिषदेकडून जिल्हा परिषद सेस अंतर्गत प्राप्त कृषि औजारे व अनुषंगिक साहित्याची तपासणी केली असता पंचायत समितीकडे कृषि विभागात गोडावून मध्ये साहित्य नादुरुस्त झाले असून विनावापर पडून आहे. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) उपरोक्त औजारे बऱ्याच दिवसापासून पंचायत समिती मधील गोडावुन मध्ये पडून असून सदरचे साहित्य प्राप्त झाल्यानंतर सदोष साहित्य का स्वीकारले गेले याबाबत खुलासा सादर करावा.

2) सदरचे साहित्य संबधित पुरवठादाराकडून बदलून घेण्याबाबत काहीच प्रयत्न केलेले दिसून येत नाही, ही बाब निश्चितच गंभीर आहे.

3) उपरोक्त सहित्य विनावाटप व विनावापर पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम रुपये 89,204/- नाहक गुंतून पडलेली आहे. याबाबत पंचायत समितीची उदासीनता दिसून येते.

4) उपरोक्त औजारे एकूण दहा विनावाटप पडून राहिल्याने लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहे. त्यामुळे योजनेचा हेतु सफल होताना दिसत नाही.

तरी साहित्य परत करुन रक्कम रुपये 89,204/- वसूलात आणून जिल्हा परिषद सेस मध्ये जमा करून लेखापरिक्षणास दाखवून दयावे.

**4.322 पंचायत समिती उपकर निधीतुन 50 टक्के अनुदानातुन एच.डी.पी.ई. पाईप खरेदी मधील अनियमितता. (पंचायत समिती सेस)**

**पंचायत समिती दर्यापुर, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती दर्यापुर अंतर्गत सन 2015-2016 मधील उपकराचे अभिलेखे तपासले असता पाईप खरेदी करीता सुधारित तरतुद 1,60,000/- केलेली असुन रुपये 1,59,800/- प्रमाणक क्रमांक 10 दिनांक 03/02/2016 रोजी खर्च केल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांचे नियोजन व अमंलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक असतांना ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, मुंबई, दिनांक 20/06/2008 प्रमाणे कार्यवाही केली नाही.

2) पंचायत समिती मासिक सभा दिनांक 21/11/2015 ठराव क्रमांक 6 अन्वये लाभार्थी निवड यादीस मंजुरी दिलेली आहे. परंतु लेखापरिक्षणास नमुद ठराव तसेच लाभार्थी यादी उपलब्ध झाली नाही.

3) प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु लेखापरीक्षणास नोंदवही उपलब्ध झाली नाही.

4) सदर योजनेमधुन 30 टक्के महीला लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबत आवश्यक ते दस्ताऐवज व नोंदवहया आढळुन आल्या नाहीत.

5) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2011/प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबत आवश्यक ते दस्ताऐवज व नोंदवहया आढळुन आल्या नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंर्वधन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्रं.323/पदुम-4, मुंबई दिनांक 11/11/2011 अन्वये योजनेच्या अंमलबजावणी करीता सर्व प्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी दिल्याबाबत दस्तऐवज उपलब्ध झाले नाही.

7) सदर लाभार्थ्यांच्या नोंदी बाबत मास्टर नोंदवही लेखापरिक्षणांस उपलब्ध न झाल्याने एकाच लाभार्थ्यांला इतर योजनेतुन दुबार लाभ झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) निवडक अर्जाची तपासणी केली असता एकाच कुटुंबात दुबार लाभ दिल्याचे दिसुन येते. उदा. अमोल प्रताप राऊत व कोकीळा प्रताप राऊत (हुसैनपुर), कल्पना मुकूंद डिके व मुकूंद मनोहर डिके (खल्लार) त्यामुळे संबंधीताकडुन दिलेल्या लाभाची रक्कम वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात जमा करणे क्रमप्राप्त आहे.

9) सदर खरेदीबाबत विभागिय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ यांचेशी मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 मधील परिशिष्ट 1 चे अनुच्छेद 63 प्रमाणे स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याचे दिसुन येत नाही.

**4.323 पंचायत समिती सेस निधी 75 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना एच. डी. पी. ई पाईप पुरविणे खर्चातील अनियमीतता.**

**पंचायत समिती धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृयो-2013/प्र.क्र.158/11ए, दिनांक 27/09/2013 शासनाच्या दरकरारा नुसार सदरचे एच.डी.पी.ए. पाईप रक्कम रुपये 470/- प्रती प्रमाणे खरेदी करण्यात आले आहे. परंतु सदरच्या दरकराराची मुदत दिनांक 31/03/2014 रोजी संपत असतांना सन 2015-2016 या आर्थिक वर्षात सदरच्या दरकरारानुसार पंचायत समितीद्वारा नियमबाहय खरेदी करण्यात आली आहे. नियमबाहयते बाबत खुलासा करावा.

2) योजना मंजुरीचा ठराव दिनांक 26/12/2015 ठराव क्रमांक 03 सदर योजनेला 50 टक्के अनुदानावर पाईप पुरविणे करीता मंजुरी दिली असतांना 75 टक्के अनुदानावर पाईप वाटप करण्यात आले आहे. 75 टक्के अनुदानावर पाईप वाटप करण्याकरीता पूर्वमंजूरीचा पंचायत समितीचा ठराव घेणे आवश्यक होते. परंतु अशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

3) दिलेल्या स्पेशिफीकेशन नुसार एच. डी. पी. ई पाईप असल्याबाबत शासकीय यंत्रणेचे प्रयोगशाळा प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले नाही.

4) पंचायत समितीने 710 पाईप नग खरेदी करण्यात आले आहे. पंचायत समितीच्या साठा पुस्तकाची तपासणी केली असता 70 लाभार्थ्यांना 700 पाईप वाटप करुन 10 नग अखेरीस शिल्लक राहणे आवश्यक असतांना शुन्य नग शिल्लक दर्शविण्यात आले आहे. 10 नग पाईप कमी शिल्लक दर्शविलेचा खुलासा आवश्यक आहे.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्याचे परिशिष्ट- ई मध्ये वेळापत्रक दिले आहे. त्यानुसार पंचायत समिती सेस निधीतील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे योजनेची प्रशासकीय मान्यता नस्तीस आढळून आली नाही. तसेच सदर परिशिष्ट- ई नुसार लाभार्थी निवड करणे आवश्यक आहे. लाभार्थीच्या अर्जाची तपासणी केली असता एकाही लाभार्थ्याच्या अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. त्यामुळे प्रत्यक्ष एच.डी.पी. ए. पाईपची खरेदी करुन नंतर लाभार्थ्यीचे अर्ज प्राप्त करुन लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे निर्देशनास येते. तसेच लाभार्थ्यांची निवड पंचायत समिती सर्वसाधारण सभेत केल्याची निवड यादी लेखापरिक्षणाला उपलब्ध झाली नाही.

6) वैयक्तीक लाभाच्या योजनेच्या लाभार्थ्याची निवड करतांना लाभार्थ्याची निवड ही ग्रामसभेतुन होणे आवश्यक असतांना अशा प्रकारची निवड समितीने न केल्याचे निदर्शनास आले.

7) निवडक प्रस्तावाची तपासणी केली असता एकाही अर्जासोबत जात प्रमाणपत्र आढळुन आले नाही. लाभार्थ्यांकडील विदयुत मोटर पंप चालु असल्याबाबत तसेच विदयुत पुरवठा चालु असल्याबाबत विदयुत बिल एकाही अर्जाला जोडलेले नसल्याचे आढळुन आले.

8) पुरवठादारांच्या देयकाची रक्कम प्रदान करतांना प्रदानाच्या रक्कमेतुन आयकराची व मुल्यावर्धीत कराची रक्कम कपात करणे आवश्यक असतांना, शासकीय कराच्या रक्कमा कपात केल्या नाहीत.

**4.324 लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे पुरवविणे.**

**पंचायत समिती दारव्हा, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,54,950/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक पसदा/वाशि/2/2015 कार्यालय दारव्हा, दिनांक 27/03/2015 यांना टिनपत्रे पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आले. त्यात दिनांक 31/03/2015 च्या आत पुरवठा करणेबाबत नमुद केले आहे. परंतु डीएमची तपासणी केली असता त्यावर छापिल क्रमांक तसेच दिनांक नमुद नाही किंवा पंचायत समिती कार्यालयात केव्हा साहित्य प्राप्त झाले याबाबत पंचायत समिती कार्यालयाकडुन कोणाचीही स्वाक्षरी नाही.

2) पुरवठा आदेशाची तपासणी केली असता 10 टक्के उर्वरीत रक्कम लाभार्थीकडुन लाभार्थी हिस्सा प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल असे अट क्रमांक 5 मध्ये नमुद आहे. म्हणजेच लाभार्थी निवड नियमानुसार योजना राबविणेचे आधी करण्यात आली नसल्याचे दिसते.

3) नस्तीची तपासणी केली असता पुरवठा आदेश क्रमांक 2/2015, दिनांक 27/03/2015 नुसार दिनांक 31/03/2015 पर्यंत टिनपत्रे पुरविणे आवश्यक असतांना दिनांक 20/06/2015 रोजी टिनपत्रे प्राप्त झाल्याची नोंद नस्तीत आहे. पुरवठा आदेशात साहित्य विलंबाने पुरविल्यास पुरवठाधारंकावर दंडात्मक कार्यवाही करणेबाबतची अट नमुद केली नाही. त्यामुळे पुरवठाधारकाने विलंबाने साहित्य पुरविले असतांना त्यांचेकडुन विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

4) प्रमाणक क्रमांक 251, दिनांक 08/07/2015 नुसार जय जगदिश सेल्स अकोला कडुन 6460 kg x दर 79.84 kg प्रमाणे रुपये 5,15,766/- ची टिनपत्रे खरेदी करण्यात आली त्याकरीता कोणत्याही नियमानुसार निविदा प्रक्रीया राबविण्यात आली नाही. पंचायत समिती झरी (झा) यांनी केलेल्या निविदा प्रक्रीयेची प्रत सोबत जोडुन त्यानुसार पुरवठा आदेश देण्यात आला. नियमबाहयपणाबाबत सहप्रमाणात खुलासा करावा.

5) सन 2015-16 या वित्तीय वर्षामध्ये पंचायत समिती कार्यालय ई-निविदा सूचना क्रमांक 9688/2015, दिनांक 03/12/2015 अन्वये प्राप्त 9 निविदा धारकापैकी कस्तुरी सप्लायर्स नागपुर यांची रक्कम रुपये 717/- प्रती नगची निविदा मंजुर करण्यात आली. सन 2014-2015 च्या अनुदानातून सन 2015-2016 मध्ये टीन पत्र्यांची जी खरेदी केली आहे, त्याचा दर अंदाजे रुपये 982.41/- येतो. त्यामुळे एकाच आर्थिक वर्षामध्ये दोन वेगवेगळया दराने खरेदी झालेमुळे सन 2014-2015 ची खरेदी जादा दराने झाली आहे.

6) शासकीय प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल घेण्यात आला नाही. त्यामुळे मंजुर Specification नुसार साहित्य योग्य गुणवत्तेची प्राप्त झाल्याची सत्यता पडताळता आली नाही. चाचणी अहवाल सादर करुन साहित्य योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत खात्री पटवावी.

7) आयकर अधिनियम 1961 चे क्रमांक 194 सी नुसार 2 टक्के आयकर रुपये 21,099/- वसुल करुन आयकर खाती जमा दर्शवावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 200/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2011 नुसार प्रशासकीय तांत्रिक मंजुरी 30 जून पुर्वी निविदा प्रक्रीया माहे सप्टेंबर मध्ये व साहित्याचे वाटप 1 ते 8 जानेवारी पुर्वी करावयाचे असतांना साहित्याचे वाटप माहे मार्च 2016 नंतर पुढील आर्थिक वर्षात करण्यात आले आहे. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

9) संबंधीत लाभार्थीचे अर्ज पंचायत समितीकडे केव्हा प्राप्त झाले, याबाबत आवक क्रमांक नमुद नाही. त्यामुळे पंचायत समितीस लाभार्थी अर्ज कोणत्या दिनांकास प्राप्त झाले याबाबत तपासणी करता आली नाही.

10) पंचायत समितीमध्ये लाभार्थींचे मास्टर रजिस्टर / नोंदवही न ठेवल्याने लेखा परिक्षणास सादर न केल्याने मागील पाच ते सहा वर्षापासुन एकूण किती व्यक्ती लाभार्थी निवडीस पात्र होते व त्यापैकी दरवर्षी किती लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यात आला किवा लाभार्थी निवड नि:पक्षरित्या झाली किंवा नाही. याबाबत खात्री करता आली नाही. मास्टर नोंदवही अदयावत करुन अनुपालन सादर करावे.

**4.325 विशेष घटक योजने अंतर्गत बैलजोडी वाटप.**

**पंचायत समिती दारव्हा, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 39) -** सन 2014-2015 दिनांक 13/08/2014 व 09/02/2015 नुसार SCP अंतर्गत बैलजोडी करीता व्दिवार्षिक 130 लाभार्थी निवड करण्यात आली. त्यात 33+7 सिंचन विहीर लाभार्थी आहेत सन 2015-2016 मध्ये 121 लाभार्थींना बैलजोडीबाबत लाभ देण्यात आला. दिनांक 09/02/2015 नुसार कृषि औजारासाठी 17 लाभार्थी निवड करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 522 संबंधीत कृषि उत्पन्न बाजार समिती गेटपास / प्रवेश फी क्रमांक 4891 बंडु सुखदेवे गाव बानायत वर दिनांक 02/06/2016 नमुद आहे. विक्रि पावती क्रमांक 1845 (विक्रेता बंडु सुखदेवे) कृषि उत्पन्न बाजार समिती दिनांक नमुद नाही. युनाइटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड पशुधन विम्याचे आवेदन पत्र लाभार्थीचे दिलेले आहे. त्यावर दिनांक 02/06/2016 आहे. पशुचिकित्सकाचे प्रमाणपत्राची तपासणी केली त्यात जनावराचे आरोग्य चांगले असुन धडधाकड असल्याचे नमुद असुन त्यावर दिनांक 02/06/2016 आहे. त्यावर पशुधन विकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती दारव्हा यांनी जनावराचे साउंडनेस प्रमाणत्रावर सुध्दा दिनांक 02/06/2016 आहे. पशुधन विमा उतरविल्याचे प्रमाणपत्र नाही. म्हणजे जनावराचा विमा करण्यात आला नाही. यावरुन प्रमाणक क्रमांक 522 नुसार बैलजोडी 02/06/2016 रोजी खरेदी केले असतांना खर्च दिनांक 31/03/2016 रोजी नोंदविला असल्याचे दिसते.

2) प्रमाणक क्रमांक 523 साठी पशुधन विम्याचे आवेदनपत्र वरील दिनांकात खाडाखोड व उपरीलेखन करुन 31/03/2016 केले आहे. बैलजोडी विमा उतरविण्यात आला नाही. कृषि उत्पन्न बाजार समिती दारव्हा विक्रि पावती क्रमांक 1495 वर दिनांकात खाडाखोड व उपरीलेखन करुन दिनांक 31/03/2016 केले आहे. लाभार्थी प्रकाश बरडे यांनी 100/- रुपये स्टॅम्प दिनांक 04/05/2016 रोजी खरेदी केला असुन कार्यकारी दंडाधिकारी शपथपत्र दिनांक 07/05/2016 रोजीचे आहे. लाभार्थी प्रकाश बरडे यांचे शपथपत्र दिनांक 07/05/2016 रोजीचे असल्याने त्यांनी बैलजोडी दिनांक 07/05/2016 रोजी खरेदी केली असतांना खरेदी पावती वर खाडाखोड करुन खरेदी दिनांक 31/03/2016 रोजीची दर्शविली असल्याचे दिसते.

3) लाभार्थींचे मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे एखाद्या लाभार्थीला दुबार लाभ दिल्या गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.326 परिच्छेद क्रमांक 19 धडक सिंचन विहिरीवर केलेल्या खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वणी, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रुपये 31,70,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

तालुका वणी जिल्हा यवतमाळ अंतर्गत येणाऱ्या अल्प भूधारक शेतकऱ्याना सिंचनाकरिता शेतात विहिर खोदणे व बांधकाम करणे याकरिता एकूण 914 विहिरी मंजुर करण्यात आल्या.

सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत समिती वणी विहिर खोदकाम व बांधकामाकरिता 3,51,99,756/- खर्च करण्यात आला**.** सदरहू खर्चाच्या संदर्भात लाभार्थ्यांच्या फाईल नस्ती मोजमाप पुस्तिका इत्याची पडताळणी केली असता पुढीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास येते.

1) 1] मारोती दामा ऊईके 2] नंदकिशोर महादेव चिने साखरा 3] दिपक लक्ष्मण बोंझलवार 4] गरूड धर्मा बोथले 5] श्री संबा मारजी पुसाम मयत 6] रामकृष्ण बापुराव काळे 7] रॉयल निलकंठ पिंपळशेंडे 8]वासुदेव माधव सोनटक्के 9] कवडू राधो काकडे 10] सौ.कुसुम रंगनाथ नांदेकर 11] श्री नंदकिशोर महादेव चिने 12] रामाजी

कुळसंगे 13] रमेश तलांडे 14] प्रुफुल मोरेश्वर चिडे 15] वासुदेव काळे 16] रामदेव कचरु 17] राजेश्वर आगलावे 18] सिताराम काळे 19] शंकर सिताराम निवारे 20] नामदेव कैलासनाथ पुसाम 21] महादेव लक्ष्मण कुंचलवार 22] अशुबाई गजानन अतकरी 23] बापुराव चिंधू खानझोडे 24] श्री नंदकिशोर नामदेव चिने 25] श्री रामदास कचरु धानघाटे 26] बापू पाचभाई 27] निळकंठ धांडे 28] कुसुम नांदेकर 29] कवडू खुळसंगे इत्यादी लाभार्थ्यांच्या अर्जाचा सातबारा मोजमाप पुस्तिकेची पडताळणी केली असता शेतात विहिर केल्याबाबत सदरहू विहिर सातबारा वर चढविली नाही. त्याची कारणे नमूद करावीत.

2) लाभार्थ्यांनां शेतात विहिर खोदण्याकरिता रक्कम रुपये 10,000/- अग्रिम देण्यात आला. परंतु 317 लाभार्थ्यांनी शेतात विहिर खोदलेली नाही. त्यामुळे 317 X 10,000 = रुपये 31,70,000/- गुंतवून पडलेले आहे. तरी याबाबत प्रशासकीय कार्यवाही करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

**4.327 पंचायत समिती सेस कृषि अंतर्गत शेतक-यांना 50 टक्के सुटीवर HDPE पाईप वाटपातील अनियमितता. (पंचायत समिती सेस)**

**पंचायत समिती बुलढाणा, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) लाभार्थीचे अर्जासोबत अटी व शर्ती नुसार शेतीचा 7/12 उतारा व विज बील असणे आवश्यक आहे. परंतु श्री. नंदकिशोर सदाशीव गवई, गाव देव्हारी येथील लाभार्थीकडे शेती बाबत 7/12 उतारा नाही. लाभार्थीला 30 नग पाईप वाटप केले आहेत.

2) 8 लाभार्थ्याचे नावे विहिरीवर इलेक्ट्रीक कनेक्शन असल्याबाबत विज बिल नाही. आवश्यकता नसतांना पाईप वाटप केलेचे दिसते.

3) लाभार्थीचे स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहुन संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती मोताळा स्वीकृती बाबत स्वाक्षरी नाही.

4) एकाच कुटुंबातील सन 2015-2016 वर्षात HDPE पाईप दोन व्यक्तीस लाभ दिलेला आहे.

5) उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नाही.

6) 3 टक्के अपंग लाभार्थी निवड करुन पाईपाचा लाभ देण्यात आला नाही.

**4.328 बोगस जात प्रमाणत्रावर एकाच कुटूंबातील दोन लाभार्थ्यांना बैलजोंडीचा लाभ दिल्याबाबत.**

**पंचायत समिती नागपूर, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती नागपूरचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात उपरोक्त प्रमाणकाची तपासणी केली असता 41 शेतक-यांना बैलजोडीचे वाटप करण्यात आले असून खर्च रोखपुस्तीकेत नोंदविण्यात आलेला आहे.

श्री.वामन दमडू पूरके व श्री.अरुण वामन पुरके यांनी जात प्रमाणपत्र क्रमांक एमआरसी-8/174/91-92, दिनांक 28/08/1991 कार्यकारी दंडाधिकारी सेलू, जिल्हा वर्धा यांनी निर्गमित केलेल्या एकाच जात प्रमाणपत्रावर खाडातोड करुन दोन प्रमाणपत्र तयार करुन योजनेचा लाभ घेतल्याचे दिसून येते. सदरील प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित नसतांना लाभार्थी अर्ज कसे काय मंजूर करण्यात आले याबाबतही खुलासा होणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे बोगस प्रमाणपत्राचे आधारे घेण्यात आलेला लाभाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

**4.329 राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम 2015-16 - 92 लाभार्थ्यांना अनुदान वाटपातील वित्तीय अनियमितता.**

**पंचायत समिती आर्वी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम सन 2015-2016 वित्तीय वर्षात 92 सयंत्राचे कामावर अनुदान रक्कम रुपये 8,38,000/- खर्च केलेला

आहे. एक सयंत्राची किंमत रुपये 24,400/- इतकी आहे. यामध्ये शासनाकडून लाभार्थ्याला अनुदान रुपये 9,000/- + लाभार्थ्याचा सहभाग रुपये 7,500/- व + बजाज फाउंडेशनचा सहभाग रुपये 7,900/- असे एकूण रुपये 24,400/- इतकी सयंत्रावर खर्च करणे आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही.

2) एक सयंत्राची किंमत रुपये 24,400/- इतकी आहे. ही रक्कम तांत्रिकदृष्टया कोणत्या प्राधिकरणाने प्रमाणित केलेला आहे याबाबत अभिलेखे नस्तीला उपलब्ध नाही.

3) करारनामा कमलनयन बजाज फाउंडेशन व पंचायत समिती / जिल्हापरिषद यांच्यात केलेला असुन यात उक्त यंत्रणेकडून बायोगॅस बांधून दिले जाईल व यासाठी लाभार्थ्याची शासनाने दिलेली अनुदान रक्कम रुपये 9,000/- प्रत्येकी ही बजाज फाउंडेशनच्या नावाने देण्यात यावे असा करारनामा केलेला आहे. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रथम अनुदानाची रक्कम रूपये 9,000/- लाभार्थीच्या बँक खात्यात जमा करून नंतर एजन्सीला देणे आवश्यक असतांना सदर अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या खातेमध्ये जमा न करता सरळ बजाज फाउंडेशच्या नावाने दिलेली आहे. हे कोणत्या नियमाने दिलेले आहे खुलासा होणे आवश्यक आहे.

4) स्टॅम्प पेपरवर घेतलेल्या करारनाम्यात 90 लाभार्थ्यांचे पूर्ण नाव, त्याची अनुदान बाबतची सहमती घेण्यात आले नाही व सरळ लाभार्थ्यांचे अनुदानाची रक्कम बजाज फाउंडेशनच्या नावे प्रदान केलेली आहे. करारनामा हा लाभार्थी व बजाज फाउंडेशनच्या नावाने असल्याखेरीज अधिकृत होत नाही.

5) बायोगॅस करीता लाभार्थ्यांकडे कमीत कमी 5 जनावरे (गोधन) असणे आवश्यक आहे. उक्त लाभार्थ्याकडे जनावरे असल्याबाबत संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक यांचा प्रमाणपत्र नाही.

6) उपप्रमाणकांची मागणी न करताच कमलनयन बजाज फाउंडेशनला रकमेचे प्रदान केलेले आहे.

7) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व संबंधीत प्राधिकरणाचे तपासणी अहवाल नाही.

**4.330 विशेष घटक योजना व ओटिएसपी योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर बैलजोडी करीता लाभार्थी निवड, बैलजोडी खरेदी व वाटपा मधील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 62,40,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेपीए-008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रकाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात येवून महिलांना 30 टक्के लाभ व अपंगाना 3 टक्के लाभ दिल्याचे दिसुन आले नाही.

2) सदर योजना अंतर्गत निवड झालेल्या व्यक्ती या अल्प उत्पन्न गटातील असल्याबाबत घेण्यात आलेले त्यांचे दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र सन 2015-2016 वा लगत पुर्वीच्या वर्षाचे नसुन 5 ते 6 वर्षाचे असल्याने या 5 ते 6 वर्षात संबंधितांच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली किंवा कसे याबाबत तपासणी होवुन अद्यावत उत्पन्नाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

3) निवड झालेल्या 208 लाभार्थींना सन 2015-2016 या आर्थिक वर्षात लाभ देण्यात आला आहे. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जावक क्रमांक विप्र-7/विघयो/ अंतरिम मासु/15-16/210/15, दिनांक 11/04/2015 च्या परीच्छेद क्रमांक 2.1 अन्वये 2 हेक्टर पर्यन्त क्षेत्र असलेल्या शेतक-यांना प्रथम लाभ देणे आवश्यक असताना त्याना प्राथम्याने लाभ न देता त्यापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या अनेक लाभार्थीना (वरील 208 मध्ये) लाभ देण्यात आला आहे.

4) ज्या ज्या लाभार्थींना योजने अंतर्गत बैलजोडीचा लाभ म्हणजेच प्रत्येकी रक्कम रुपये 30,000/- चा लाभ देण्यात आला आहे. त्यांनी कृषि उत्पन्न् बाजार समितीच्या प्रवेश पावती सादर केली नाही.

अ) प्रत्यक्ष विक्री व्यवहार करतेवेळी प्रत्यक्षात विकणाऱ्यास प्रदान केलेल्या रक्कमेचे अभिलेखे उपलब्ध नाहीत.

ब) विक्री केल्याचे दर्शविलेली जनावरे ही विक्रि करणाऱ्या इसमाच्याच मालकीची असल्याबाबत आवश्यक अभिलेखे जसे संबंधीत पोलीस पाटील, पोलीस स्टेशनचे प्रमाणपत्र नाही.

क) खरेदी विक्रीचा व्यवहार हा संबंधीत कृषि अधिकारी व विमा प्रतिनिधी यांचे समक्ष करण्यात यावा कृषि आयुक्तालयाच्या सुचना आहेत मात्र सदर 208 लाभार्थींचा एकही व्यवहार हा या दोघांच्या समक्ष झाल्याची अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन खात्री पटविणे आवश्यक आहे.

इ) ज्या लाभार्थींने बैलजोडी खरेदी केली त्यालाभार्थींने ती जनावरे प्रत्यक्षात प्राप्त/हस्तांतरण झाल्याचे व त्या लाभार्थींने ती त्यांच्या गावी नेल्याबाबत संबंधीत पोलीस पाटील, सरपंच व पशुगणना अधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही.

ई) पशुवैद्यकिय प्रमाणपत्रांमध्ये जनावराचा विमा काढण्यात आला असुन जनावराच्या कानावर टॅग नंबर लावल्याची नोंद क्रमांक नाही, तसेच पशुधन स्वास्थ दाखल्यामध्ये बैलजोडीचे वय, उंची से.मी नमुद नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय आखंस/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 प्रमाणे लाभार्थींचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

6) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जावक क्रमांक विप्र-7/विघयो/अंतरीम मासु/15-16/210/15, दिनांक 11/04/2015 नुसार विविध सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभांची विशिष्ट प्रमाणात तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र सन 2014-2015 व सन 2015-2016 मध्ये दिल्या गेलेल्या लाभांबाबत तशी तपासणी करुन लाभार्थी योजनेचा वापराबाबत उपयोगिता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे योजनेअंतर्गत केलेल्या खर्चाचा वापर योग्य त्या लाभार्थी करीता केल्याचे व लाभार्थी त्याचा सदुपयोग करीत आहे किंवा त्याने अनुदानाअंतर्गत मिळालेली साधने, पशुधन यांची विक्री तर केली नाही यांची खात्री करता येत नाही.

7) दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्याचे उत्पन्न वाढवुन त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्याकरीता सदरची योजना केन्द्र शासन व राज्यशासन राबवित आहे. परंतु लाभार्थींपैकी किती शेतकरी दारिद्रय रेषेच्यावर जीवन जगत आहेत. याची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे योजनेमधील शासनाचा उद्देश सफल झाल्याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

**4.331 विशेष घटक योजना व ओटिएसपी योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर सिंचनविहिर करिता लाभार्थी निवड, शेतक-याच्या शेतावर सिंचनविहिर बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, हिगणघाट येथील सन 2015-2016 मध्ये विशेष घटक योजना व ओटिएसपी योजने अतर्गत 100 टक्के अनुदानावर सिंचनविहिर संबंधी लाभ दयावयाच्या 103 लाभार्थींची निवड यादी तयार करुन रक्कम रुपये 55,02,129/- अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निवड झालेल्या लाभार्थींचे निवडक अर्ज तपासले असता अर्जावर कार्यालयाचा आवक क्रमांक व दिनांक नोंदविण्यात आला नाही.

2) शासन निर्णय रोजगार हमी योजना दिनांक 01/07/1999 अन्वये जवाहर विहिरीचे कार्यारंभ आदेश लाभार्थ्यांना देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) शासन निर्णय दिनांक 10/10/2004 अन्वये उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के (शतमान) तपासणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन येत नाही.

4) लाभार्थींच्या नस्तीला भुजल सर्वेक्षण यंत्रणा यांचे भुगर्भ तपासणी केल्याचे अहवाल जोडलेले नाही. त्यामुळे विहिरीला पाणी लागल्याची खात्री करता आली नाही.

5) लाभार्थीची स्वतंत्र नस्ती ठेवण्यात आली असून नस्तीसह शेतकऱ्याचा शेत असल्याचा 7/12 जोडण्यात आला आहे. परंतु त्यावर विहिरीची नोंद केलेली नाही.

6) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जावक क्रमांक विप्र-7/विघयो/अंतरिम मासु/15-16/210/15, दिनांक 11/04/2015 परिशिष्ट दोन मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार विविध सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभांची विशिष्ट प्रमाणात तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र सन 2014-2015 व सन 2015-2016 मध्ये दिल्या गेलेल्या लाभांबाबत तशी तपासणी करुन लाभार्थी योजनेचा वापराबाबत उपयोगिता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय आखंस/1093/प्र.क्र.1239/34/दिनांक 01/09/1993 प्रमाणे लाभार्थीचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थीना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

8) दारिद्रय रेषेखालील शेतक-याचे उत्पन्न वाढवुन त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्याकरीता सदरची योजना केन्द्र शासन व राज्यशासन राबवित आहे. परंतु लाभार्थीपैकी किती शेतकरी दारिद्रय रेषेच्यावर जीवन जगत आहेत. याची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे योजनेमधील शासनाचा उदेश सफल झाल्याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

**4.332 प्रवास भत्याचे नियमबाहय शोधनाबाबत.**

**पंचायत समिती साकोली, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती साकोली येथील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, कृषि विभागातील सौ.आर.आर.डोंगरे व श्री.बी.बी.मेश्राम कृषि अधिकारी यांचे प्रवास भत्याचे देयकाचे वरील प्रमाणकान्वये रक्कमांचे एकुण रुपये 22,555/- चे शोधन करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/1089/368, दिनांक 19/08/1997 अन्वये शासन आदेशानुसार तरतुदी विचारात घेवुन कर्मचाऱ्यांना कार्यालय व फिरतीच्या दौऱ्यासाठी व्यक्तीगत वाहने वापरण्यास अटीचे अधीन राहुन परवानगी दिले आहे.

2) कि.मी. भत्ता (नियम क्रमांक 395) अन्वये दोन ठिकाणांमधील प्रवास करताना जवळचा व कमी खर्चाचा मार्ग निवडण्यात यावा व त्यानुसार खर्च अनुज्ञेय ठरविण्यात यावे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक 1995/अर्थसंकल्प-19, दिनांक 06/04/1995 मधील मार्गदर्शन तत्वाप्रमाणे ग्रामीण भागात करावा लागणाऱ्या दौऱ्याकरीता व्यक्तीगत वाहन वापरण्यास कृषि विभाग जिल्हा परिषद भंडारा यांनी परवाणगी दिलेली नाही. तसेच वैयक्तीक वाहन वापरण्यास परवानगी मिळण्याकरीता कर्मचाऱ्यानी मागणी विवरण सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे झालेला प्रवासभत्ता खर्च वसुली होणे आवश्यक आहे.

4) सरद कर्मचाऱ्याने खाजगी वाहनाने प्रति कि.मी. रुपये 3.50 प्रमाणे जादा कि.मी. दाखवून जादा कि.मी. भत्याचे शोधन झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर जादा कि.मी. भत्याचे शोधनाचे परिगणित करुन संबंधितांकडुन वसुली होणे आवश्यक आहे.

5) सदर कर्मचाऱ्यानी प्रवासभत्ता हे उत्पन्नाचे साधन बनविल्यामुळे शासन निधीचे हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) एक वर्षावरील देयक असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा याची मंजुरी घेतलेली नाही.

**4.333 मागासवर्गीय लाभार्थ्यांना 90 टक्के सुटीवर ताडपत्र्या पुरविणे.**

**पंचायत समिती लाखनी, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** सन 2015-2016 मधे ताडपत्री खरेदीवर रक्कम रुपये 3,94,476/- पंचायत समिती सेस फंडातुन खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र. क्र.41/33, दिनांक 17/01/2001 नुसार योजना राबविताना पाळावयाच्या वेळापत्रकाचे पालन करण्यात आले नाही. लाभार्थीची निवड 30 जून पुर्वी किंवा खरेदीपुर्वी करावयाची असुन लाभार्थी कडुन लाभार्थी हिस्सा वसुल करुन लाभार्थी यादी निश्चीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. लाभार्थी हिस्सा दिनांक 02/05/2016 ते 07/07/2016 या कालावधीत वसुल करण्यात आला आहे. म्हणजेच सन 2015-2016 च्या योजनेचा लाभ सन 2016-2017 मध्ये देण्यात आला.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार आयएसआय मार्क असलेली सर्वात कमी दराची व कमी जीएसएमची ताडपत्री खरेदी करणे बंधनकारक असताना देखील पंचायत समिती लाखणीने 370 जी एस एमची रुपये 3,043/- दराने 144 नग रुपये 4,38,307/- ला खरेदी केले. शासन निर्णयानुसार 200 जीएसएमची ताडपत्री खरेदी करणे आवश्यक होते. जादा जीएसएमच्या ताडपत्रीची आवश्यकता भासली याबाबत कोणतेही कारण लेखा परिक्षणास सादर करण्यात आले नाही. 200 जीएसएमची ताडपत्री वापरास अयोग्य असल्याबाबतचा कोणताही तांत्रिक पुरावा सादर करण्यात आला नाही. त्यामुळे अंदाजे रुपये 2,00,000/- चे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर जादा प्रदानाचा खर्च लेखामान्य करता येत नाही. याबाबत जबाबदारी निर्धारित करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

3) सर्व ताडपत्रीचे वाटप करुन 10 टक्के लाभार्थी हिस्सा रुपये 43,831/- पुरवठाधारकांस प्रदान करुन पावती सादर करणे आवश्यक आहे.

4) लेखापरिक्षण कालावधीपर्यंत 40 नग शिल्लक होते.

**4.334 राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम सन 2015-2016 बाबत.**

**पंचायत समिती गोंडपिंपरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम सन 2015-2016 अंतर्गत बायोगॅस संयंत्राचे बांधकामाकरीता जिल्हा स्तरावरील योजने अंतर्गत प्रती लाभार्थी रुपये 10,000/- अनुदान 16 लाभार्थींना वाटप केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बायोगॅस संयंत्राचे बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचा बायोगॅस संयंत्रासहीत लाभार्थ्याचे फोटो नस्तीला नाही.

2) बायोगॅस संयंत्राचे खोदकाम व बांधकामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

3) लाभार्थ्यांकडून भरुन घेण्यात आलेले फॉर्म मधील नमुना IV बांधकाम पूर्णत्वाच्या सर्टिफिकेट मध्ये बायोगॅस संयंत्राचे काम कोणत्या तारखेस पूर्ण झाले व कोणत्या तारखेपासून संयंत्र सुरळीत चालु हे नमुद नाही.

4) राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम सन 2015-2016 अंतर्गत बायोगॅस संयंत्राला जोडून शौचालय बांधकाम केल्यामुळे प्रोत्साहनपर अनुदान रुपये 1,200/- प्रती लाभार्थी यांना धनादेशाद्वारे देण्यात आले व त्याखाली संबंधीत लाभार्थ्यांची पावतीवर प्राप्त झाल्याबाबत सही आहे. परंतु काही ठिकाणी त्याचा धनादेश क्रमांक व दिनांक नमुद नाही.

**4.335 बैलजोडी खरेदी योजनेमधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती चिमुर, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 28) -** कृषि विभागाकडून 100 टक्के अनुदानावर लाभार्थ्यास बैलजोडी खरेदी करुन देण्यात आलेली आहे व त्यावर रुपये 13,65,500/- एवढा खर्च दर्शविण्यात आलेला आहे. यावर खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, झेडपीए/2008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन अमलबजावणीचे वेळापत्रकाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

1) सदर योजने करिता 30 टक्के महिलांना लाभ देणे आवश्यक आहे.

2) सदर योजने करिता 3 टक्के अपंगानासुद्धा लाभ देणे आवश्यक आहे.

3) कृषि व पशू संवर्धन विभाग, शासन निर्णय दिनांक 19/09/2000 नुसार निवड केलेल्या लाभधारकास दिनांक 01/05/2001 नंतर एकुण अपत्यांची संख्या 3 पेक्षा जास्त झाल्यास त्यांना लाभ देऊ नये असे स्पष्ट नमुद असतांना अपत्याबाबत प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.

4) लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ झाल्यास कृषि अधिकारी यांनी मुल्यांकन अहवाल देणे आवश्यक आहे.

5) बैलजोडी खरेदी करतांना जिल्हा कृषि अधिकारी यांना पाचारण करण्याची तरतुद शासन निर्णयामध्ये असतांना सुध्दा बैलजोडी खरेदी करतांना त्यांना बोलविण्यात आल्याचे दिसुन आले नाही.

**4.336 50 टक्के अनुदानावर एच.डी.पी.ई. पाईपच्या वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 28/03/2016 अन्वये रक्कम रुपये 87,373/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश दिनांक 14/01/2016 ला देण्यात आला परंतु लाभार्थ्यांची निवड अद्यापपर्यंत केलेली नाही. म्हणजेच लाभार्थ्यांची निवड न करता पुरवठा आदेश दिल्याचे दिसुन येते.

2) पुरवठा आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे साहित्य 30 दिवसाचे आंत पुरवठा करावयाचे होते. परंतु साठा पुस्तकाची तपासणी केली असता साहित्य कधी प्राप्त झाले त्याचा दिनांक नमुद केलेला नाही. तसेच साहित्य कधी वाटप केले. ते दिनांक, अनुक्रमांक साठा पुस्तकांत नमुद केलेले नाही. म्हणजेच सदर साहित्य आदेशाप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री होत नाही.

3) नस्तीसोबत साहित्य प्राप्त झाल्याचे डिलिव्हरी मेमो (DM) जोडलेले नाही.

4) सदर साहित्य चांगल्या दर्जाचे प्राप्त झाल्याबाबत शासकीय तंत्रनिकेतन कार्यशाळेचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेंतलेले नाही.

5) लाभार्थ्यांची मंजुर निवड यादी नस्तीसोबत जोडलेली नाही. त्यामुळे निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आल्याबाबत खात्री होत नाही.

6) लाभार्थ्यांच्या अर्जाची तपासणी केली असता लाभार्थ्यांच्या अर्जासोबत ग्रामपंचायत दाखला, उपयोगिता प्रमाणपत्र, अनुदान पावती व 7/12 उतारा नसतांना लाभ दिल्याचे दिसुन येते.

7) महाराष्ट्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446 वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे योजना न राबविल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही.

**4.337 एस.सी.पी. अंतर्गत शेतक-यांना सिंचन विहीरीकरीता अर्थसहाय्य करणेबाबत.**

**पंचायत समिती चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषि आयुक्तालयाचे अंतरीम मार्गदर्शक सुचना क्रमांक 487, दिनांक 04/05/2013 मधील अट क्रमांक 2.7 अन्वये सदर योजना समुह विकास दृष्टीकोन समोर ठेवुन मागास तालुक्यातील अत्यंत मागासलेल्या गावाची निवड करावयाची असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) सदर मार्गदर्शक सुचनेतील अट क्रमांक 3 अन्वये शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्धारीत प्रमाणानुसार महिला व अपंग लाभार्थीची निवड करावयाची असताना अपंग लाभार्थीची निवड केलेली नाही.

3) सदर मार्गदर्शक सुचनेतील अट क्रमांक 6.2 अन्वये योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडुन करावयाचे असताना करण्यात आले नाही.

4) सदर शेतकऱ्यांच्या विहीरीला लागलेल्या पाण्याचे स्तोत्र किती आहे याबाबत भुजल सर्वेक्षण विभागाकडुन तपासणी अहवाल तयार करणे आवश्यक असताना तपासणी अहवाल उपलब्ध करून दिला नाही.

5) सदर विहिरीची नोंद 7/12 ला घेण्यात आल्याचे आढळले नाही.

**4.338 विशेष घटक योजना विहिर बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कन्नड, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 35) -** सदरबाबत रक्कम रुपये 16,98,673/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मार्गदर्शक सुचनांनुसार कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद व विभागीय कृषि सहसंचालक यांनी केलेल्या तपासणीचा अहवाल कृषि आयुक्तालयास दर महिन्यास सादर करण्यात यावा. परंतु तपासणीचा अहवाल लेखापरिक्षणात पाहावयास मिळाला नाही.

2) कृषि आयुक्त, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना क्रमांक विघयो/मासु/07-08/विप्र-5/151/07, दिनांक 02/05/2012 नुसार लाभधारकास कोणकोणत्या बाबीवर लाभ द्यावयाचा आहे. त्याचा बाबनिहाय आराखडा तयार करणे आवश्यक होते परंतु असा आराखडा तयार केल्याबाबत लेखापरिक्षणात पहावयास मिळाला नाही.

3) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे दिनांक 02/05/2012 मधील मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थी यांना दिलेल्या लाभाबाबत पंचायत समिती निहाय अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही. तसेच विहिरीच्या कामाची तपासणी जिल्हा कृषि अधिकारी(विघयो), जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी केलेली नाही.

4) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक असतांना ठेवलेली नाही.

5) सदर योजनेचे त्रयस्थ संस्थेकडुन मुल्यांकन करुन घेण्याची अट आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

6) कृषि आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना दिनांक 02/05/2012 प्रमाणे कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती स्तर यांनी 100 टक्के, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी 10 टक्के, कृषि अधिकारी जिल्हा परिषद यांनी 5 टक्के, अधिक्षक कृषि अधिकारी यांनी 1 टक्का, विभागीय कृषि संचालक यांनी 0.75 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. पंरतु अशी तपासणी करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्रं.-55/34, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीची गावनिहाय मास्टर नोंदवही नाही. त्यामुळे एकाच लाभार्थीस दुबार लाभ मिळयाची शक्यता नाकारता येत नाही. तरी नोंदवही दर्शवुन पुर्तता करावी.

**4.339 विशेष घटक योजनेअंतर्गत बैलजोडी 100 टक्के अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती परतूर, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,20,000/- लाभार्थ्यास बैलजोडी खरेदी करण्यासाठी अनुदान वाटप करण्यात आले. प्रति लाभार्थी 30,000/- एकूण 14 लाभार्थ्यांला वाटप केल्याचे दिसून येते. त्यापैकी मंजूर यादीत नाव नसतांना त्यांना सुध्दा रुपये 30,000/- दिल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1089/646/43, दिनांक 29/07/1989 अन्वये लाभार्थ्यास अनुदान प्रदान केल्याचा फलश्रुती अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.वि.वि/1080/सि.आर/67, दिनांक 29/07/1993 नुसार सदर योजनेचा हेतू सफल झालेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55364, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थी मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला जाण्याची शक्यता नाकरता येत नाही.

4) शासन निर्णय क्रमांक आऊसो/1610/प्र.क.159/4-ए, दिनांक 12/08/2010 मधील परिशिष्ट एक मधील अनुक्रमांक 4 नुसार बैलजोडी सुधारीत अनुदान मर्यादा 30,000/- देय आहे. याचा शासन निर्णयातील मुदयातील क्रमांक 2 नुसार बँक मार्फत अदाई करण्यात यावी असे निर्देश आहेत. प्रत्यक्षात अधिकारी यांनी पशुबाजारात बैल जोडीची खरेदी केलेली आहे. याबाबत खात्री पटवावी.

5) शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग क्रमांक आउयो 1610/प्रक्र159/4A मुंबई दिनांक 12/08/2010 मधील मधील परिशिष्ट 2 मधील क्रमांक 4 व 5 नुसार लाभार्थीस अर्थ सहाय्याची योजना निहाय, बाबनिहाय, लाभार्थीनिहाय नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी कृषि अधिकारी यांनी सुध्दा तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

6) 38 लाभार्थ्यांस शासनाकडून बैलजोडीचा लाभ दिला आहे. परंतु फलश्रृती अहवाल कृषि अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिला नाही. याबाबत पुर्तता दर्शवावी.

7) महाराष्ट्र शासन, कृषि व पशुसंवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक कृविघयो 1607/प्र.क्र.139/4, दिनांक 03/09/2007 नुसार लाभधारकास कोणकोणत्या बाबीवर लाभ घ्यावयाचा आहे. त्याचा बाबनिहाय आराखडा तयार करणे आवश्यक होते. असा आराखडा लेखापरिक्षणात दर्शविला नाही तो दर्शवावा.

8) बैलजोडी दृढ व शेती कामास योग्य असल्याबाबत पशुवैद्यकिय अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेतल्याचे दर्शवावे.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार योजना राबविली गेली नाही.

**4.340 पंचायत समिती पाथरी अंतर्गत विशेष घटक् योजना विहीर बांधकामातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती पाथरी अंतर्गत सन 2015-2016 या वित्तीय वर्षात प्राप्त अनुदानातुन कृषी विभागांतर्गत विशेष घटक योजना विहीर बांधकामावर रक्कम रुपये 35,88,666/- एवढा खर्च केलेला आहे. नोंदवही, प्रमाणके व संचिकाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाच्या मोजमापपुस्तीका तपासल्या असता असे दिसून आले की, वेगवेगळ्या साखळीतील खोदकामची मोजमापे घेताना प्रत्यक्षात खोदकाम कोणत्या प्रकारच्या भुस्तरात जसे (कठीण मुरूम, मऊ खडक, कठीण खडक) करण्यात आले याबाबत संबंधितांनी मोजमाप पुस्तीकेत नोंद घेतलेली नाही. तसेच केवळ खोदकामची खोली नमूद केली आहे.

2) कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्रंमाक विप्र/5/आऊयो/भासु/09-10/482/2009, दिनांक 27/07/2009 मधील अंतिम मार्गदर्शक सुचना परिशिष्ट-2(10) नुसार भुजल सर्वेक्षण यंत्रणेच्या निकषानुसार विहीरीच्या स्थळाच्या योग्यता (Feasibility Report) रिपोर्ट करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न करता रेखांकन देवून कार्य आदेश देण्यात आले आहेत.

3) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक मग्रारो-2011/प्रक्र-24/रोहयो-10-अ, दिनांक 10/03/2011 मधील परिच्छेद 4 नुसार विहीरींना मंजूरी देताना भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून त्याच्या निकषाप्रमाणे पाण्याच्या उपलब्धेबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

4) प्रत्येक विहीर ही स्वतंत्र काम असल्याने त्यास लाभार्थीनिहाय वेगवेगळी तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आहे तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

5) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रंमाक 1611/प्र.क्र.112/4ए, दिनांक 03/05/2011 मधील परिच्छेद 4(2) नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

6) कृषि आयुक्तालय पुणे यांचे आदेश क्रंमाक विघयो/मासू/विप-2005, दिनांक 20/06/2005 प्रमाणे पुर्ण झालेल्या विहीरीच्या नोंदी 7/12 वर घेतल्या नाहीत त्यामुळे कामे झाल्याचे प्रमाणित करता येत नाही.

7) कृषि, आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे दिनांक 02/05/2012 मधील मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थी यांना दिलेल्या लाभाबाबत पंचायत समिती निहाय अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही तसेच विहीरीच्या कामाची तपासणी जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) / जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केलेली नाही.

8) रेखांकन करण्यापूर्वी लाभार्थ्यासहित निवडलेल्या जागेचा फोटो घेतल्यानंतरच पंचनामा करून फोटो पंचनामा घेऊनच कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही. तसेच कामापूर्वीचे व कामानंतरचे फोटो लावलेले नाहीत.

9) उपरोक्त मार्गदर्शक सूचनानुसार योजनेचा मासिक प्रगती अहवाल विहित केलेल्या प्रपत्रात प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत कृषि आयुक्तालय व समाजकल्याण विभागाकडे पाठविण्यात यावा असे निर्देश असताना अशी कार्यवाही केल्याचे अभिलेख्यावरून दिसून आले नाही.

10) श्री.विकास अर्जुन अंभोरे यांचा करारनामा (बॉन्ड) लेखापरीक्षणास दर्शवीला नाही. द्वारकाबाई अर्जुन झोटिग यांच्या करारनाम्यावर किती जमीन आहे याची नोंद नाही. अजयसिंह बाळकृष्ण कांबळे आणि वसंत तुकाराम शेळके यांच्या करारनाम्यावर अटी व शर्ती नाहीत. तरी सदरील बाबीबाबत खुलासा व्हावा.

11) योजनेचा हेतु जो उद्देश होता तो साध्य झाला याबाबत पाहणी अहवालाद्वारे उपयोगिता प्रमाणपत्रे निर्गमित होणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झाल्याची सत्यता पटवावी.

**4.341 विविध कृषि योजनेअंतर्गत साहित्य वाटप करुन लोकवाटा भरणा न करणे बाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद उपकर अंतर्गत कृषि विभाग पंचायत समितीला किती साहित्य प्राप्त झाले. साठा रजिस्टर व भरणा केलेल्या लोकवाटा धनाकर्ष तपशिल इत्यादी अभिलेख्याच्या तपासणी केली असता गोदामपाल श्री.बी.डी.सावके यांनी संबंधीत लाभार्थ्याकडून लोकवाटा रुपये 3,25,575/- साहित्यनिहाय वसूल केला. परंतु लोकवाटा जिल्हा परिषद फंडात भरण्यात आलेला नाही.

विविध कृषि योजनेअंतर्गत साहित्य वाटप करुन लोकवाटा भरणा न केलेल्या साहित्याचा प्रलंबित लोकवाटा श्री.बी.डी.सावके गोदामपाल यांचेकडून रुपये 3,25,575/- वसूल करुन जिल्हा परिषद उपकरात भरणा करावी.

**4.342 पंचायत समिती उपकर अंतर्गत कृषी योजना 50 टक्के अनुदानावर चाकजोडी पूरवठा करणे बाबत.**

**पंचायत समिती कळमनुरी, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,99,231/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड रुपरेषा लाभार्थी निवड 30 जुन पर्यंतकरुन खरेदी नोव्हेंबर मध्ये करुन साहित्याचे वाटप जानेवारी पर्यंत करावयाचे आहे. शासनाच्या निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

3) केंद्र शासन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क नूसार देयकातून आयकर रक्कम रूपये 19,976/- कपात न करता रक्कम प्रदान केली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास.1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी निविदा बोलावण्यापुर्वी खरेदी करण्यापुर्वी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत लाभार्थीची निवड करावयास पाहिजे. परंतु लाभार्थीची निवड केलेली नाही. तसेच ठराव पूस्तक लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाही.

5) लाभार्थीचे अर्ज तपासले त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या

अ. योजनेचा यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक यांनी दिले असून ते प्रमाणीत नाही.

ब. लाभार्थी उत्पन्नाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी ऐवजी तलाठी यांचे आहे.

क. लाभार्थी अर्ज अपूर्ण असून साक्षांकीत केलेले नाहीत.

6) साठा नोंदवहीत डीलेव्हरी चालानची नोंद नाही. त्यामूळे वस्तूचा साठा नेमका कधी प्राप्त झाला याची खात्री करता येत नाही. साठा नोंदवहीवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामूळे दूबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) प्राप्त 193 नगापैकी 144 नग शिल्लक असून लेखापरिक्षणात दिनांक 24/04/2017 पर्यंत नग वाटप करण्यात आले नाहीत. त्यामूळे निधी गूंतून पडला आहे तरी याबाबत 144 नगाचे दर रूपये 5,175/- प्रमाणे रूपये 7,45,200/- पन्नास टक्के अनूदान रूपये 3,72,600/- वसूल करून शासन खाती भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा मूळ हेतू सफल होत आहे किंवा नाही याबाबत योग्य ती सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही. त्यामूळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

9) लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 4,99,484/- पूरवठा धारकास प्रदानाची पोच नाही.

10) उपरोक्त योजनेच्या संचिकेची तपासणी केली असता असे दिसुन आले की लाभार्थ्याचे मागणी अर्ज प्रस्ताव तालुकानिहाय संचिकेत निदर्शणास आले नाही. तसेच लाभार्थी निवडीचे निकष 3 टक्के अपंग लाभधारकांना लाभ दिलेल्याचे दिसुन आले नाही. लाभधारकाकडुन लाभार्थी हिस्सा रक्कम जमा केल्याबाबत पावती पुस्तके लेखापरीक्षणास दर्शवलेली नाही. त्यामुळे निवड यादीतील लाभधारकांना लाभ दिल्याची खात्री करता आली नाही.

11) सदर लाभार्थ्यांना विषय समितीची मान्यता असल्याबाबत विषय समिती कार्यवृत्तांत नोंदवही सादर न केल्याने तपासणी करता आली नाही.

12) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद इ नुसार औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक / पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व / पुरवठा पश्चात तपासणी अहवाल या सर्व बाबींची नोंद साठा / वाटप नोंदवहीत घेणे आवश्यक असताना यापैकी काही बाबींची नोंद साठा / वाटप नोंदवहीत घेतली नाही.

13) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतरिम मार्गदर्शक सूचना जावक क्रमांक वि.प्र./07/ आउयो/अंतरीम मासु/14-15/460/2014, दिनांक 02/06/2014 मधील 6.2 ते 6.9 नुसार विभागाकडे त्रयस्त यंत्रणेमार्फत योजनेचे मुल्यमापन, योजनेचा फलश्रुती अहवाल, यशोगाथा व इतर बाबी नुसार कार्यवाही केल्याचे अभिलेखे दिसुन आले नाही.

14) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 02/06/2014 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार योजनेअंतर्गत निवड झालेले लाभार्थी अर्थसहायाचा दुरउपयोग करणार नाही. यासाठी योजना राबविणा-या अधिका-यांनी तपासणी केल्याचे अहवाल दिसून आले नाही.

15) तसेच मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-2 नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार रुपये 10,000/- पेक्षा किमतीच्या औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 2.5 टक्के आणि रुपये 10,000/- ते 50,000/- किमतीच्या औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 1.5 टक्के नमुने क्षेत्रीय स्थरावर काढून त्याची गुणवत्ता तपासणी कृषि विद्यापीठे / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांचेकडून पुरवठा पश्चात क्षेत्रीय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही.

**4.343 विशेष घटक योजना विहीर योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मुदखेड, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 38) -** विशेष घटक योजनेतंर्गत पंचायत समिती मुदखेड अंतर्गत सोबत जोडलेल्या यादीतील लाभार्थींना विहीरीचा लाभ देण्यात आला असून केलेल्या कामाच्या मुल्यांकनाप्रमाणे त्यांना अदायगी करण्यात आली आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्रंमाक विप्र/5/आऊयो/भासु/09-10/482/2009, दिनांक 27/07/2009 मधील अंतिम मार्गदर्शक सुचना परिशिष्ट-2 (10) नुसार भुजल सर्वेक्षण यंत्रणेच्या निकषानुसार विहीरीच्या स्थळाच्या योग्यता (Feasibility Report) रिपोर्ट करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न करता रेखांकन देवून कार्य आदेश देण्यात आले आहेत.

2) नियोजन विभाग शासन निर्णय मग्रारो-2011/प्रक्र-24/रोहयो-10-अ, दिनांक 10/03/2011 मधील परिच्छेद 4 नुसार विहीरींना मंजूरी देताना भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून त्याच्या निकषाप्रमाणे पाण्याच्या उपलब्धेबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

3) वरील शासन निर्णयातील परिच्छेद 2 नुसार विहीरीच्या कामाचे तांत्रिक मापदंड खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. आकारमान 4.50 मीटर x 15 मीटर तथापि वरीलप्रमाणे भुस्तर निहाय विहीरीचे मापदंड निश्चीत केले असले तरी प्रत्येक भागाची स्थानिक/भौगोलिक स्थिती भिन्न आहे तेव्हा पंचायत विभागांतर्गत घेण्यात आलेल्या संपुर्ण विहीरीसाठी एक ठराविक अंदाजपत्रक/विहीरीचे आकारमान एकाच तांत्रिक मापदंडात कोणत्या आधारे निश्चीत करण्यात आले याबाबत लेखापरीक्षणास खात्री पटवावी व मुल्यांकन योग्य असल्याबाबत मंजूर अंदाजपत्रक दर्शवून केलेल्या मुल्यांकनाबाबत खात्री पटवावी.

4) प्रत्येक विहीर ही स्वतंत्र काम असल्याने त्यास लाभार्थी निहाय वेगवेगळी तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

5) कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्रंमाक विप्र/5/आऊयो/भासु/09-10/482/2009, दिनांक 27/07/2009 मधील अंतिम मार्गदर्शक सुचना परिशिष्ट 3 (11) मधील मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेचे अंमलबजावणी यशस्वीरित्या होत असल्याबाबत योजनेची तपासणी करुन अहवाल सादर करणे आवश्यक आहे तथापि अशा मार्गदर्शक सुचनाचे पालन केलेबाबतचे अभिलेखे दर्शविण्यात आले नाही.तपासणी अहवाल दर्शवून योजनेच्या फलश्रुतीबाबत खात्री पटवावी.

6) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रंमाक 1611/प्र.क्र.112/4ए, दिनांक 03/05/2011 मधील परिच्छेद 4 (2) नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयची प्रत्येक नोंद मोजमापपुस्तिकेत घेताना मोजणीचा दिनांक बांधकामाचे पुर्ण नांव, बांधकामाची जागा, करारनाम्याचा क्रंमाक आणी दिनांक, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कार्यादेश क्रंमाक, कार्यपूर्ती दिनांक इत्यादी चा तपशील नोंदविणे आवश्यक आहे. तथापि मोजमापे नोंदविताना सदरील माहिती नोंदविली नाही.

8) कृषि आयुक्तालय पुणे यांचे आदेश क्रंमाक विघयो/मासू/विप-2005, दिनांक 20/06/2005 प्रमाणे पुर्ण झालेल्या विहीरीच्या नोंदी 7/12 वर घेतल्या नाहीत त्यामुळे कामे झाल्याची खात्री होत नाही.

9) शासन निर्णय दिनांक 02/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 व परिपत्रक दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीची गाव निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अशी नोंदवही ठेवण्यात आली नाही.

10) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे दिनांक 20/06/2005 मधील मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थी यांना दिलेल्या लाभाबाबत पंचायत समिती निहाय अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही तसेच विहीरीच्या कामाची तपासणी जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केलेली नाही.

11) विहीरीतून पाणी उपसासाठी (Dewatering the excavated trenches) लॉगबुक ठेवले नसल्याने व ही बाब मोजमाप पुस्तकात दर्शविलेली नसल्याने पाण्याच्या उपलब्धतेबाबत खात्री होवू शकली नाही.

**4.344 वाटपाअभावी पडून शिल्लक असलेल्या साहीत्याबाबत.**

**पंचायत समिती अर्धापूर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती अर्धापुर जिल्हा नांदेडचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात कृषी विभाग पंचायत समितीकडील कृषि औजारे, सयंत्रे साठा नोंदवहीचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे उणीवा आढळुन आल्या.

1) दैनदिन साहीत्य वाटपावर गटविकास अधिकारी यांच्या सहया घेतल्या नाहीत. त्यामुळे साहीत्य वाटपाच्या सत्यता पटु शकली नाही. तसेच नोंदवहीच्या रकाना क्रमांक 12 वाटप साहीत्याचे मुल्य रकाना 14 शिल्लक साहीत्याचे मुल्य नमुद केलेले नाही. रकाना क्रमांक 15 मध्ये वाटप करणा-याची सही नाही.

2) साठा नोंदवहयाप्रमाणे लेखापरीक्षण दिनांकापावेतो एकूण 46 विविध शेती औजारे वाटपाअभावी शिल्लक असल्याचे दिसुन आले. साहीत्य लेखापरीक्षण दिनांकापावेतो वाटपाअभावी का पडुन आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. जास्त कालावधीपर्यंत वापराअभावी पडुन राहील्यास ते निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा ज्या योजने अंतर्गत साहीत्याची खरेदी करण्यात आली आहे. त्या योजने अंतर्गत मंजुर निवड यादीतील ज्या लाभार्थीस वाटप करणे बाकी आहे त्या संबंधीत लाभार्थ्यांना सदरील साहीत्य वाटप करुन अनुपालन दर्शवावे.

**4.345 50 टक्के अनुदानावर लोखंडी चाक जोडी खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती नायगांव, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,48,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र. 680/वित्त्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केलेबाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-09, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर योजना राबविण्यासाठी विहित वेळापत्रकानुसार अंबलबजावणी विहित केलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाले नंतर व लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पूर्ण करून त्यांचे कडून लोकवाटा / हिस्स्याची रक्कम जमाकरूनच साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे तथापि पंचायत समितीने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) सदर योजनेत उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरून प्रसिद्धी देऊन इच्छुक लाभधारकाकडून अर्ज मागवून प्राप्त अर्जातून अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या लाभार्थीची निवड करून निवड यादीस पंचायत समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यपद्धती न अवलंबिता जसे जसे अर्ज प्राप्त होतील व पंचायत समिती सदस्यांचे शिफारसी नुसार जसे जसे लाभार्थी प्रस्ताव प्राप्त होतील. तसे तसे साहित्य वाटप केल्याचे दिसून येते. तसेच साहित्य खरेदी करून साहित्य वाटपाच्या वेळी लोकवाटा भरून घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे अवलंबिलेली प्रक्रिया वित्तीय औचीत्यास अनुसरून नाही.

4) पुरवठा आदेश : जा.क्र. 4185, दिनांक 02/12/2015 अन्वये 96 लोखंडी चाकजोडी प्रति नग रुपये 5,175/- प्रमाणे विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी, उद्योग विकास महामंडळ, नांदेड यांना 45 दिवसांचे आत साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. तथापि साहित्य विहित मर्यादेपेक्षा 57 दिवस उशिराने प्राप्त झाल्याचे दिसून येते. (Invoice no.91 date- 14/03/2016) विलंबाबाबत दंडाची कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

5) लाभार्थ्याने, पंचायत समितीने दिलेल्या लाभाचा दुर्विनियोग अथवा विक्री करू नये. म्हणून त्यांचेकडून 100 रुपयेच्या बंधपत्रावर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समितीने अशी उचित कार्यवाही केलेली नाही.

6) एकाच लाभार्थ्यास, शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसले बाबतचे पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

7) योजना अंमलबजावणी नंतर लाभार्थ्याकडून उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सक्षम प्राधिकारी यांचा योजने बाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

8) साठ नोंदवही नमुना नं.33 ची तपासणी केली असता असता खरेदी केलेल्या चाकजोडी (96) पैकी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत (दिनांक-15/10/2016) 80 चाकजोडी शिल्लक आढळून आले. यावरून गरज नसताना अनावश्यक खरेदी केले असल्याचे दिसून येते.

**4.346 नॅकस्कॅप स्प्रे पंप खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धर्माबाद, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** उपरोक्त प्रमाणकाअन्वये पंचायत समिती धर्माबाद सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात माहे 2/16 व 3/16 च्या प्रमाणकांच्या तपासणीत 2 प्रमाणकान्वये 50 टक्के व 75 टक्के अनुदानावर नॅकस्कॅप स्प्रे पंप रक्कम रुपये 3,48,880/- खरेदी केली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र कृषि, उद्योग विकास महामंडळ मर्यादित मुंबई यांचेकडून नॅकस्कॅप स्प्रे पंपखरेदी केले असून संबंधीत नोंदवहीमध्ये घेतलेल्या नोंदीनुसार त्यांचे वाटप करण्यात आले आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त, दिनांक 20/06/2008 प्रमाणे खरेदी पूर्वी लाभार्थी निश्चितीसह योग्य ते नियोजन करून प्रस्ताव अंतिम करणे व विहित वेळेत लाभ देण्याचे वेळापत्रक तयार करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केली नाही. लाभार्थ्यांनी केलेली स्प्रे पंपची मागणी संचिकेत दिसून आली नाही. त्यामुळे मागणी नसताना सदर स्प्रे पंप खरेदी केल्याचे दिसून येते. तसेच मागणी नसताना पुरवठा आदेश प्रदान करण्यात आला आहे जे कि नियमबाहय तसेच शासन निर्णयाशी विसंगत आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार वाटप साहित्य वापरात असल्याची खात्री करून लाभार्थीच्या आर्थिक स्थितीचा अहवाल घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक आखंस/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 प्रमाणे लाभार्थीचे मास्टर रजिस्टर ठेवल्याचे लेखापरीक्षणास दर्शविले नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ प्रदान करण्यात आला किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते ज्याची मास्टर नोंदवहीच्या अभावी खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/1239, दिनांक 01/09/1993 अन्वये सदर योजना मूल्यमापन व फलश्रुती झाली किंवा कसे याबाबत आढावा घेण्यात आला नाही.

6) संबंधीत लाभार्थ्यांची यादी पंचायत समितीच्या बैठकीत ठराव घेवून मंजूर करण्यात आल्याचे अभिलेखे संचिकेत आढळून आले नाही.

**4.347 विशेष घटक योजनेअंतर्गत बैलजोडी खरेदी व वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धर्माबाद, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** सदरबाबत रक्कम रुपये 13,20,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, विस्तार व शिक्षण कृषी आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना आदेश क्रमांक विप्र-7/विघयो /अंतरिम मा. सु./11-12/574, दिनांक 24/04/2011 नुसार चे बैलजोडीची खारेदी संबंधी खरेदी व विक्रीचा व्यवहार कृषि अधिकरी व विमा प्रतिनिधी यांचे समक्ष करण्यात यावा आशा सुचना आहेत. मात्र हा व्यवहार दोघांच्या समक्ष झालेचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून खात्री पटविने आवश्यक आहे.

2) बैलजोडी लाभार्थाना प्रत्येकी रूपये 30,000/- मात्र लाभ देण्यात आला आहे. त्यांनी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेश पावती दिल्याची दिसुन आले नाही.

3) प्रत्यक्ष विक्री व्यवहार करतेवेळी प्रत्यक्षात विकाणा-यास प्रदान केलेल्या रक्कमेची अभिलेख विक्रीच्या दिनांकास व नंतर केलेले प्रदान किती या बाबतचा अभिलेखे दिसुन आले नाही.

4) ज्या व्यक्तीने बैलजोडी खरेदी केली त्या व्यक्तीस ती जनावरे प्रत्यक्षात प्राप्त / हस्तांतरण झाल्याचे व त्या व्यक्तीने ती त्यांच्या गावी नेल्या बाबत संबंधीत पोलीस पाटील, सरपंच व पशुगणना अधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही.

5) लाभार्थी नमुणा क्रमांक 3 दर्शविलेली नाही.

6) उपरोक्त शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभांची विशिष्ट प्रमाणात तपासणी होणे आवश्यक आहे, तशी तपासणी झाल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे योजने अंतर्गत केलेल्या खर्चाचा वापर योग्य त्या व्यक्ती करीता केल्याचे व उपयोगीता प्रमाणपत्र दिसुन येत नाही, तसेच ती व्यक्ती त्याचा सदुपयोग करीत आहे किंवा त्यांने अनुदाना अंतर्गत मिळालेली साधने, पशुधन यांची नंतर विक्री तर केली नाही याची खात्री करतो येत नाही.

7) विमा छात्राची प्रत तपासणीत आढळुन आलेली नाही.

8) नगर परिषद बिलोली यांचे बैल खरेदीची दाखले जोडले आहे. तथापि दाखल्यावर दाखला क्रंमाक दिलेला असुन दाखला बुक क्रमांक नाही. सदर दाखले ठेकेदार बाबा खजामिया कुरेशी यांच्या मार्फत दिले असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरील सर्व दाखला बुक नगरपरिषदेकडुन देण्यात आलेलेली आहेत किंवा कसे या बाबत खात्री पटविता आलेली नाही. त्याबाबत नगरपरिषदेकडुनच दाखला बुक देण्यात आल्याबाबत खात्री करावी.

9) मास्टर नोदवहीची तपासणी केली असता दुबार लाभ दिल्याचे दिसुन येते.

**4.348 पंचायत समिती परांडा, कृषी गोदामात विनावाटप पडून असलेल्या साहित्याबाबत**

**पंचायत समिती परांडा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती परांडाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात कृषि गोदामाचे साठा नोंदवहीची तपासणी केली असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 98 (1) नुसार गटविकास अधिकारी यांनी दर वर्षी जूनमध्ये साठा नोंदवहीची पडताळणी करुन नियम 98 (3) मधील विहीत नमुन्यांत प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) कृषि विभागाकडील साठा नोंदवहीची तपासणी केला असता सन 2006-07 मधील केंद्र पुरस्कृत विकास योजनेतर्गत 25 टक्के अनुदानावर लाभार्थीना 22 नॅपसॅक स्प्रे पंपाची 27 नग एचडीपीई पाईपचे वाटप करण्यासाठी खरेदी करण्यात आली. सदर साहित्य हे लाभार्थीना आजतागायत वाटप करण्यात न आल्याने व विनावापर पडुन राहिल्याने निकामी झालेले आहे. त्यामुळे रुपये 75,355/- (22 x 3100 व 27 x 265) चे नुकसान झालेले आहे. याबाबत संबधीतावर जबाबदारी निश्चीत करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 36 (1) नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.